# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ / पौष १, १९४३ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**<br>**(३) गृहनिर्माण मंत्री**<br>**(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६७**

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या घरांच्या सोडतीमध्ये पात्र ठरलेल्या विजेत्या गिरणी कामगारांना घराचा ताबा मिळण्याबाबत

**(१) * १०९९६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (एमएमआरडीए) पनवेल, कोन येथील भाडेतत्त्वावरील गृह प्रकल्पातील घरे दीड लाखांहून अधिक गिरणी कामगारांना देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राखीव ठेवण्यात आली असून सन २०१६ मध्ये २४१७ घरांसाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाने काढलेल्या सोडतीत विजेत्यांची पात्रता निश्चिती पूर्ण करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देकारपत्रे देण्यात आलेल्या अनेक कामगारांनी गृहकर्ज घेवून घराची पूर्ण रक्कम भरली असून त्यांच्या गृहकर्जाचा समान मासिक हप्ता देखील सुरु झाला असतानाही पात्र ठरलेल्या विजेत्या गिरणी कामगारांना किंवा त्यांच्या वारसांना अद्यापही घरांचा ताबा मिळाला नसल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विजेत्यांनी घराचे पैसे भरल्यानंतरही गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना घरांचा ताबा अद्याप न देण्यात आल्यामुळे विजेत्यांना म्हाडा कार्यालयात वारंवार यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गतवर्षी कोरोना काळात जिल्हाधिकारी, रायगड यांनी सदरहू घरांचा ताबा कोरोनाबाधितांच्या विलगीकरणासाठी घेतला असून एमएमआरडीएने अनेक वेळा याबाबत स्मरणपत्रे पाठवूनही घरांचा ताबा अद्यापपर्यंत सोडण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय;

(५) असल्यास, उक्त ठिकाणच्या सोडतीत विजेत्या ठरलेल्या गिरणी कामगार किंवा त्यांच्या वारसांना घरांचा ताबा देण्यासाठी सदरहू घरांचा ताबा जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून एमएमआरडीएकडे तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) व (६) सदरहू सदनिकांचा ताबा एमएमआरडीएला मिळणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांचे कार्यालयाकडे एमएमआरडीए कार्यालयाकडून पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरु आहे.

सदरहू सदनिका एमएमआरडीएच्या ताब्यात आल्यानंतर, एमएमआरडीए कडून म्हाडाच्या ताब्यात आल्यानंतर सोडतीमध्ये पात्र ठरलेल्या विजेत्या गिरणी कामगारांना सदनिकांचा ताबा देण्याची कार्यवाही म्हाडाकडून करण्यात येईल.

-----------------

## अकोला (जि.अकोला) येथील विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२) * १०२९१ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड : तारांकित प्रश्न क्रमांक ७२१३ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९४३ मध्ये ब्रिटिश शासनाच्या काळात अकोला शहरात सार्वजनिक बांधकाम विभागाने शिवनी विमानतळाची उभारणी केली असून, सदर स्थानिक विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनास प्रस्ताव सादर केल्यानंतर, संयुक्त मोजणी अंती २२.२४ हेक्टर आर जमिनीची आवश्यकता असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याकरीता डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मालकीची एकूण ६०.६८ हेक्टर जमीन हस्तांतरीत करुनही सदर प्रकरण प्रलंबित असल्याने भूसंपादनाबाबतचा व्यवहार्यता अहवाल तयार करुन शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस देण्यात आल्याचे व त्यानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना कळविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत अकोला विमानतळाच्या विकासाबाबत व विस्तारीकरणाबाबत व्यवहार्यता अभ्यास अहवाल तयार करण्यास सुचविले होते, त्यानुसार सदर विमानतळाचा व्यवहार्यता अभ्यास अहवाल भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी तयार करावा असे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने त्यास कळविले होते, यासंदर्भात भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून उत्तर प्राप्त झाले नाही, त्याअनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली अकोला विमानतळाच्या विकासाकरीता आढावा बैठक दिनांक ७ फेब्रुवारी, २०२० रोजी घेण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्र्यांनी अकोला विमानतळाच्या विकासाबाबत व विस्तारीकरणाबाबत व्यवहार्यता अभ्यास अहवाल करण्यास सुचविले. अकोला विमानतळ हे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या मालकीचे असल्याने सदर विमानतळाचा व्यवहार्यता अभ्यास अहवाल भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी करावे असे म.वि.वि.कंपनीने दिनांक २ मार्च, २०२० च्या पत्राद्वारे त्यांस कळविले होते. त्यानुसार भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून अकोला विमानतळाचा Information report शासनास दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ रोजी प्राप्त झाला आहे. तथापि, सदर अहवालात कोणतीही तांत्रिक शक्यशक्यता नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे योग्य feasibility report देण्याबाबत म.वि.वि.कं.कडून भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास ईमेलव्दारे दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी पुन्हा कळविण्यात आले आहे. त्याबाबत उत्तर अद्याप प्राप्त झाले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील तलाव कांदळवन म्हणून घोषित केल्याने मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत

**(३) * १०७५८ श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खाडीलगत असणारे तलाव कांदळवन म्हणून घोषित केले आहेत, हे खरे आहे काय, असल्यास, सदर तलाव कांदळवन म्हणून केव्हा घोषित करण्यात आले आहेत,

(२) असल्यास, नवी मुंबईतील २९ गावे नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आली असून त्या गावात मासेमारीवर उपजीविका करणारे घटक मोठ्या प्रमाणात असून त्यांचा मच्छीमारीचा व्यवसाय हा वडिलोपार्जित आहे, परंतु शासनाने भारतीय वन अधिनियम १९२७ कलम २० आणि कांदळवन म्हणून घोषित केलेल्या तलावांमधील गाळ काढण्यासाठी परवानगी दिली जात नसल्याने किनाऱ्यावरील मच्छीमारांच्या उपजीविकेची साधने बंद झाल्याने सदर घटकावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागाने गाळ काढण्याच्या संदर्भात समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला असूनही त्याची अंमलबजावणी झाली नसून अनेक लोकप्रतिनिधीं जिल्हाधिकाऱ्यांकडे सन २०१८ पासून पाठपुरवठा करीत असल्याचे तसेच अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक एन वासुदेवन यांच्याकडे यासंदर्भात बैठक आयोजित करून पत्रव्यवहार करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कांदळवन कक्ष विभागामार्फत तामिळनाडू येथे मच्छिमारांसाठी योजना राबविल्या जातात परंतु, नवी मुंबई व ठाणे येथे गाळ काढण्याची बंदी घातली जाते याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी अधिकाऱ्यांना विचारणा केली असता समिती स्थापन करून गाळ काढण्याची परवानगी देऊ असे आश्वासन देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील वर्षानुवर्षे सुरु असलेल्या मासेमारीच्या व्यवसायावर प्रतिबंध आल्यामुळे मच्छिमार बांधवांनी नुकसान भरपाई देण्याची मागणी शासनाकडे केली असून या प्रकरणी मच्छिमार संघटनेने जिल्हाधिकारी, नवी मुंबई यांचेकडे निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्यातील १४७१.४१२ हे.आर कांदळवन क्षेत्र शासन अधिसूचना दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ नुसार राखीव वन म्हणून अधिसूचित झाले. त्यापैकी १४५८.७००७ हे.आर कांदळवन क्षेत्र हे शासन अधिसूचना दिनांक २० जानेवारी, २०२१ नुसार भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २० अंतिमत: राखीव वन म्हणून अधिसूचित झाले आहे.

(२) हे खरे नाही.

ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याच्या व्यवस्थापन आराखडयामध्ये खाडी क्षेत्रात स्थानिक मच्छिमारांना परंपरागत मासेमारी करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

श्री.वासूदेव धर्मा वेटा, अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती, नवी मुंबई यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदने दिलेली आहेत. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. तथापि, कांदळवन विभागाने गाळ काढण्यासंदर्भात समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला नाही. सदरचे क्षेत्र हे अधिसूचित कांदळवन म्हणून घोषीत झालेले असून त्या जागेचा वैधानिक दर्जा राखीव वने आहे. त्यामुळे त्या ठिकाणी गाळ काढण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

श्री.वासूदेव वेटा, अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती, नवी मुंबई यांनी जिल्हाधिकारी व इतर महसूल अधिकाऱ्यांकडे केलेल्या निवेदनांमध्ये नुकसान भरपाईची मागणी केल्याचे दिसून येत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरोग्य विभागाच्या 'गट-क' व 'गट-ड' पदाच्या रद्द केलेल्या परीक्षा प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(४) * ११०८५ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक २२ एप्रिल, २०२१ रोजी वा त्या सुमारास परिपत्रक काढून भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कार्यकक्षेतील 'गट-ब' व 'गट-क' ची पदे सरळसेवेने भरताना पॅनेलवरील कंपनीमार्फतच परीक्षा प्रक्रिया राबवावी अशा सूचना निर्गमित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाआयटीने राबविलेल्या निवड प्रक्रियेत ठराविक सेवा पुरवठादार कंपन्यांना फायदा व्हावा यासाठी वेळोवेळी निविदा अटी व शर्तींमध्ये बदल केला तसेच काळ्या यादीतील कंपन्यांची निवड केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यासा कम्युनिकेशन कंपनीकडून आरोग्य विभागाच्या 'गट-क' व 'गट-ड' वर्गाच्या तसेच ग्रामविकास विभागाच्या जिल्हा परिषद संवर्गातील परीक्षा आयोजनात गोंधळ निर्माण झाल्यामुळे उमेदवारांना मोठ्या प्रमाणात मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आरोग्य विभागाच्या 'गट-क' व 'गट-ड' पदासाठीच्या स्थगित कराव्या लागणाऱ्या परीक्षा प्रकरणाची तसेच सेवा पुरवठादार कंपन्यांचे पॅनल तयार करण्यासाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियेची सीआयडी, सीबीआय किंवा निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी करावी अशी मागणी मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी त्यांच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) होय.

(२) कोरोना महामारीच्या काळात आणीबाणीच्या परिस्थितीमुळे निविदेस मुदतवाढ देणे अनिवार्य ठरले. जास्तीत जास्त कंपन्यांचा सहभाग होणे अपेक्षित असल्याने दोन (२) वेळेस निविदेतील अटी शिथिल करण्यात आल्या.

निविदाकारांकडून निविदा दाखल करताना केंद्र किंवा इतर कोणत्याही राज्य शासनाच्या विभागांकडून ब्लॅक लिस्ट किंवा बहिष्कृत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात आले. तसेच काही कंपन्यांकडून अतिरिक्त माहिती मागविण्यात आली. ज्या शासकीय/निमशासकीय विभागांनी बिडर्स ब्लॅकलिस्ट केले, त्यांचेकडे त्याचा खुलासा मागविण्यात आला, त्यानुसार निवडप्रक्रियेदरम्यान, दोन अपात्र बिडर्स वगळून, पात्र बिडर्सची निवड करण्यात आली आहे.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परीक्षा घेण्यास मेसर्स न्यास कम्युनिकेशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांनी असमर्थतता दर्शविली आहे. तसेच, ग्रामविकास विभागाच्या पदभरतीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

(४) व (५) होय.

परीक्षा आयोजनातील गोंधळाच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाने पोलीस आयुक्त, मुंबई यांना चौकशीचे पत्र दिले आहे. तसेच, गट-ड परीक्षेच्या पेपरफुटीबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस चौकशीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच, पदभरती परीक्षेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मेसर्स न्यास कम्युनिकेशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्न्तीमधील आरक्षण कायम ठेवण्याबाबत

**(५) * १०९७० श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील कर्मचारी व अधिकारी यांना पदोन्नतीमधील आरक्षण देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात सुनावणी प्रलंबित असून विमुक्त जाती, भटक्या जमातीचे पदोन्नतीमधील आरक्षण असंविधानिक आहे, अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र राज्य शासनाने मा.उच्च न्यायालयात दाखल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमुक्त जाती, भटक्या जमाती हा प्रवर्ग राज्यघटनेच्या अनुच्छेद १६ (४) नुसार तयार करून या प्रवर्गाला आरक्षण देण्यात आले असून राज्य शासनाने कोणत्या धर्तीवर राज्यघटनेविरुध्द प्रतिज्ञापत्र सादर केले आहे तसेच आरक्षण कायम ठेवण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींनी विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या लाखो कर्मचारी व अधिकाऱ्यांवर अन्याय करणारे हे प्रतिज्ञापत्र तातडीने मागे घेण्याबाबतची मागणी दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अन्यायकारक प्रतिज्ञापत्र मागे घेऊन विमुक्त जाती व भटक्या जमाती व कर्मचारी यांचे आरक्षण कायम ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) व (२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी आरक्षण अधिनियम, २००१ च्या वैधतेचा प्रश्न खुला ठेवून पदोन्नतीमध्ये आरक्षण देणारा दिनांक २५ मे, २००४ चा शासन निर्णय रद्द केला. मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ च्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे.

मागासवर्गीयांची पदोन्नती व सरळसेवेमधील प्रतिनिधित्वाची व मागासलेपणाची माहिती संकलित करुन त्यांचे शासन सेवेतील आरक्षण निश्चित करण्यासाठी दिनांक २२ मार्च, २०२१ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केलेली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात शासनाच्या वतीने शपथपत्र दाखल केले होते.

मा.सर्वोच्च न्यायालयातील सरकारी वकील व ज्येष्ठ विधिज्ञ यांच्या सल्ल्यानुसार दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात सुधारीत शपथपत्र दाखल केलेले आहे. सुधारीत शपथपत्रान्वये आरक्षण अधिनियम, २००१ अनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क व भटक्या जमाती-ड व विशेष मागास प्रवर्ग यांना पदोन्नतीमध्ये दिलेले आरक्षण कायम ठेवावे, अशी विनंती राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयास केली आहे.

(३) दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ व त्यासुमारास विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या लाखो कर्मचारी, अधिकाऱ्यांवर अन्याय करणारे प्रतिज्ञापत्र तातडीने मागे घेण्याबाबतचे लोकप्रतिनिधींचे पत्र या विभागास प्राप्त झालेले नाही. तथापि, डॉ. विकास महात्मे, संसद सदस्य (राज्यसभा) यांचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२१ चे निवेदन या विभागास प्राप्त झालेले आहे.

(४) राज्य शासनाने दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ रोजी आरक्षण अधिनियम, २००१ अनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड व विशेष मागास प्रवर्ग यांना पदोन्नतीमध्ये दिलेले आरक्षण कायम ठेवावे, असे सुधारीत शपथपत्र मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर मेट्रो स्टेशनकरिता नियुक्त केलेल्या ग्रेट वॉल व महामेट्रो या कंपन्यांच्या कारभाराची चौकशी करण्याबाबत

**(६) * ११२५३ श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मेट्रो स्टेशनकरिता ग्रेट वॉल प्रा लि या कंपनीकडे सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचारी नेमण्याचा परवाना असताना त्यांना नियमबाहय पध्दतीने एफ.एम.एस कर्मचारी नियुक्तीचे अधिकार महा मेट्रोमार्फत देण्यात आले तसेच सदर कंपनीने नियमबाहय पध्दतीने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पगार कपात केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामेट्रोने वेंन्डर ईव्हॅल्युएशन प्रकिया न राबविता व बोर्ड मिटींगमध्ये मंजूरी न घेता मनमानी निर्णय घेत कंपनीला सातत्याने मुदतवाढ दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रेट वॉल कंपनीला कार्यादेश मिळाल्यापासून आजपर्यंत निकृष्ट दर्जाच्या कामगिरीमुळे दरवर्षी अंदाजे रुपये ३० लाखाचा दंड लागत असतानाही सदर कंपनीस वारंवार मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना लागु असलेल्या वेतनात कंपनीमार्फत मनमानी पध्दतीने कपात केली जात असून कर्मचाऱ्यांना सुचित केले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन ग्रेट वॉल कंपनी व महामेट्रो यांच्यातील कराराची चौकशी करणार आहे काय, चौकशीनूसार निकृष्ट दर्जाची कामगिरी करणाऱ्या अशा कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नागपूर मेट्रो स्टेशन व डेपोकरीता कार्यान्वयन व देखभाल व दुरुस्ती या सेवांसाठी आवश्यक मनुष्यबळ पुरवण्याकरीता महामेट्रोने विहित ई-निविदा प्रक्रिया राबवून नियुक्त केलेल्या मेसर्स ग्रेटवाल कॉर्पोरेट सर्विसेस प्रा. लि. या अभिकरणाशी माहे एप्रिल, २०१८ ते माहे मार्च, २०२० या कालावधीकरीता तसेच माहे एप्रिल, २०२० ते माहे मार्च, २०२१ या कालावधीकरीता दोन स्वतंत्र करारनामे करण्यात आले आहेत. माहे मार्च, २०२० नंतर माहे मे, २०२० पर्यंत व तदनंतर माहे मे, २०२२ पर्यंत अशी दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. सन २०१९ पासून बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरीता केंद्र शासनाच्या ऐवजी राज्य शासनाचे प्रचलित नियम लागू केले आहेत.

(२) हे खरे नाही.

मेसर्स ग्रेटवाल कॉर्पोरेट सर्विसेस प्रा. लि. व महामेट्रो यांच्या दरम्यान झालेल्या करारातील तरतुदीनुसार व महामेट्रोच्या संचालक मंडळाने प्रदत्त केलेल्या अधिकारान्वये व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो यांचेस्तरावर उक्त अभिकरणाच्या सेवाकालावधीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

सेवेतील विविध त्रुटींसाठी आकारण्यात येणाऱ्या दंडाचे स्वरूप आणि प्रमाण करारामध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार कंत्राटदारावर दंड आकारण्यात येतो. त्याचप्रमाणे मुदतवाढ देण्याची तरतूद सुद्धा करारामध्ये आहे. दंड आणि मुदतवाढ यांची सांगड करारानुसार नमूद नाही.

(४) हे खरे नाही.

(५) माहे एप्रिल, २०१८ ते माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंत कंत्राटदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवेतील त्रुटींमुळे कंत्राटदारास एकूण रुपये ५३.१४ लाख इतका दंड आकारण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत (जि.ठाणे) बांधकामांना मंजूरी देताना झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(७) * १०४५४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत (जि.ठाणे) वास्तुशिल्पकार श्री.शिरिष नाचणे यांनी शासनाने २७ गावांकरीता मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमधील टेबल क्र.१३ ए च्या अनुषंगाने ६० टक्के अतिरिक्त प्रिमियम एफएसआय ३८७२.३७ चौ.मी प्रस्तावित केलेला असून त्यानुसार बांधकाम नकाशे सादर केलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वास्तुशिल्पकार श्री.शिरिष नाचणे यांनी दिनांक ०७ सप्टेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त प्रिमियम एफएसआय भरणा करणार असल्याबाबतचे विनंतीपत्र महानगरपालिकेस सादर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेत युडीसीपीआर (UNIFIED DEVELOPMENT CONTROLLED PROMOTIONAL REGULATION FOR MAHARASHTRA STATE) ची प्रक्रिया चालू असल्यामुळे शासनाने कुठलेच ईपी मंजूर केलेले नसताना सदरहू प्रिमियम कोणत्या मंजूरीच्या अधीन राहून आकारण्यात आला आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदरहू एफएसआय (चटई निर्देशांक) मध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार तसेच चुकीच्या नोंदी करुन मंजूरी देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात कलम २६ ते ३१ अन्वये महानगरपालिकेने ३० टक्के प्रिमियम दर मागितला होता तो नाकारण्यात आला असताना तसेच ईपी मंजूर केलेले नसताना सदरहू आकारण्यात आलेला दर कशाच्या आधारे निश्चित करण्यात आला आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच सन २००२ पासून सदर भूखंडावरील ओपन लँड टॅक्स किती वसूल करण्यात आला आहे,

(६) असल्यास, सदर प्रकरणी विद्यमान आयुक्त श्री.विजय सुर्यवंशी यांनी कोणतीही शहानिशा अथवा पडताळणी न करता सदर नस्तीवर "मान्य" असा शेरा देऊन श्री.जगताप (सर्व्हेअर) श्री.साबळे (ट्रेसर), कनिष्ठ अभियंता श्री.देविदास जाधव व नगररचनाकार श्री.राजेश मोरे, सहायक संचालक श्री.मा.द राठोड यांच्या संगनमताने आर्थिक गैरव्यवहार करुन शासनाचे व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार उक्त आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार तसेच चुकीच्या नोंदी करुन बांधकामांना मंजूरी दिल्याप्रकरणी कार्यरत आयुक्त श्री.विजय सुर्यवंशी, श्री.जगताप (सर्व्हेअर) श्री.साबळे (ट्रेसर), कनिष्ठ अभियंता श्री.देविदास जाधव व नगररचनाकार श्री.राजेश मोरे, सेवानिवृत्त सहायक संचालक श्री.मा.द राठोड या अधिनस्त दोषी अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हे नोंदवून निलंबनाची कारवाई करण्याबाबत तसेच बांधकामांना दिलेली चुकीची मंजूरी/परवानगी तात्काळ रद्द करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमधील मौजे भोपर येथील सर्व्हे क्र.२३७/५ व इतर या जमिनीचे हद्दीनुसारचे किमान क्षेत्र ६४५३.९५ चौ.मी.(७/१२ उतारे प्रमाणे ६९६०.०० चौ.मी.) विचारात घेवून त्यावर अनुज्ञेय अतिरीक्त वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक ६०% (Additional Premium FSI) नुसार अनुज्ञेय होणारे बांधकाम क्षेत्र ३८७२.३७ चौ.मी. बांधकाम क्षेत्रासह नकाशे सादर करण्यात आले होते.

(२) होय.

(३), (४) व (५) १) कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या अधिसुचीत क्षेत्राची विकास योजना (ई.पी.वगळून) शासनाने दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी मंजूर केली आहे. तसेच उर्वरीत विकास योजना (ई.पी.) शासनाने दिनांक ९ मे, २०१७ रोजी मंजूर केली आहे. सदरच्या मंजूर विकास योजनेमधील मंजूर ई.पी.१५३ मधील टेबल क्र.१३A मधील तरतुदीनुसार

बेसिक चटई क्षेत्र निर्देशांक ०.९५ नुसार अनुज्ञेय बांधकाम ६१३१.२५ चौ.मी. व ३० मी. रुंद रस्त्याचा पुढावा विचारात घेवून त्यानुसार अनुज्ञेय अतिरीक्त वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक ६०% (Additional Premium FSI) नुसार अनुज्ञेय होणारे बांधकाम क्षेत्र ३८७२.३७ चौ.मी., एवढे वाढीव पेड प्रिमियम बांधकाम क्षेत्रासह १०००३.६२ चौ.मी. बांधकाम क्षेत्राचे नकाशे महानगरपालिकेकडे सादर करण्यात आले होते. सदरच्या क्षेत्रापैकी आयुक्त यांनी एकूण ९७६०.२१ चौ.मी. प्रस्तावित बांधकाम क्षेत्रास मान्यता दिली होती. परंतु वास्तुविशारद यांचेकडील पत्राच्या अनुषंगाने वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाच्या (Additional Premium FSI) एकूण अनुज्ञेय बांधकामापैकी १८०८.०० चौ.मी. बांधकाम क्षेत्र विचारात घेवून एकूण ७९१३.९५ चौ.मी. बांधकाम क्षेत्रास दिनांक ०९/११/२०२० रोजी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्रदान केले आहे.

शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरीत क्षेत्रासाठी दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) जनतेच्या सुचना /हरकतीसाठी प्रसिध्द केली होती. सदरच्या प्रसिध्द विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र.१.३ नुसार सदरची नियमावली ही, शासनाने मंजूरी प्रदान केल्यानंतर अंमलात येणार असल्यामुळे बांधकाम परवानगी देतेवेळी सदरची प्रारुप प्रसिध्द एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली विचारात घ्यावयाची बाब उद्‌भवत नाही.

२) विषयांकित भूखंडावर सन २००२ ते सन २०२१ पर्यंत रुपये ८,९६,६५६/- ओपन लॅण्ड टॅक्सची आकारणी करुन तो महानगरपालिकेस भरणा करण्यात आला आहे.

३) सदर प्रकरणी सविस्तर अहवाल प्राप्त करुन घेवून यावर उचित निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

(६) नाही.

(७) व (८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेतील कोट्यवधी रुपयांच्या टीडीआर गैरव्यवहाराप्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(८) * १०४२५ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या तत्कालीन आयुक्त यांच्याशी संगनमत करून विकासकांनी देवळाली (जि.नाशिक) येथील भूमापन क्रमांक २९५ मध्ये आरक्षित करण्यात आलेल्या जागेच्या भूमापन क्रमांकांऐवजी अन्य जागेचा रेडीरेकनरचा इंडेक्स क्रमांक टाकून सुमारे शंभर कोटी रुपयांचा टीडीआर गैरव्यवहार केल्याप्रकरणी शासनाने चौकशी समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने अहवाल शासनास सादर केला आहे काय, सदरहू अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि तदनुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) अति.आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आलेली असून प्रकरणाची व्याप्ती व्यापक व शासनाच्या विविध विभागाशी संबंधित आहे. तसेच हरकतदार व जमीनमालक यांचा जबाब घेण्यात आलेला असून समितीचा अंतिम अहवाल प्रलंबित आहे.

(३) मध्यंतरीच्या काळात कोरोना निर्बंध असल्याने समितीच्या बैठका होऊ शकल्या नाहीत. तसेच शासनाच्या इतर विभागाकडील अभिप्राय प्रलंबित आहे.

-----------------

## मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत

**(९) * १०४३६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथे ९२ एकर जागेत उभ्या असलेल्या शासकीय वसाहतीच्या (शासकीय कर्मचारी निवासस्थान) पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात २,१२० घरे बांधण्यात येत असून यापैकी ४५० घरांचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ४५० घरे माहे मे, २०२२ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाला हस्तांतरित करण्यात येणार असून चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांना या घरांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित घरांचे काम कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे तसेच सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीच्या भागश: भूखंडावर २१३२ कर्मचारी निवासस्थाने बांधण्याचे काम प्रगतीत आहे. यातील बी-१ या एका इमारतीचे आर.सी.सी. काम पूर्ण झाले असून छतावर पाण्याच्या टाक्यांचे काम प्रगतीत आहे. सी-१ दुसऱ्या इमारतीचे १६ पैकी १३ व्या मजल्याचे आर.सी.सी. चे काम प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत या दोन्ही इमारतींमधील लादीकाम, प्लंबींग, विद्युतीकरण व इतर अनुषंगिक पायाभुत सुविधा कामे प्रगतीत आहेत.

(२) हे खरे आहे.

माहे मे,२०२२ पर्यंत ४५० घरे पूर्ण करुन सामान्य प्रशासन विभागास हस्तांतरीत करण्याचे नियोजन आहे.

(३) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निविदेच्या मूळ कालावधीत या प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे कंत्राटदारास माहे ऑगस्ट, २०२२ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या वाढीव कालावधीत काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे. या प्रकल्पाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व स्तरावर नियमीत आढावा बैठक घेण्यात येत आहे. विद्युत विभागामार्फत विद्युतीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत

**(१०) * १०८२५ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ८६९ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) सावित्री नदीवरील पुल कोसळून घडलेल्या घटनेमुळे शासनाने राज्यातील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे संबंधित विभागास निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील किती पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले व करण्यात आलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटनुसार किती पुल हे धोकादायक स्थितीत आहेत,

(३) असल्यास, राज्याच्या दळणवळणाच्या क्षेत्रात नद्या आणि ओढ्यांवरील पुलांच्या कोसळण्याच्या दुर्घटना लक्षात घेऊन केंद्रीय महालेखापालांनी पुलांचे सर्वेक्षण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर केलेल्या सर्वेक्षणात सन २०१६ मध्ये राज्यात असणाऱ्या पुलांच्या संख्येतील दुरुस्तीसाठी प्रतीक्षेत असणारे २ हजार ६३५ पुलापैकी केवळ ३६३ पुलांची डागडुजी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील सुमारे २ हजार २७२ पुलांच्या दुरूस्त्या प्रलंबित असून या पुलांव्यतिरिक्त ३०० हून अधिक पुलांची मुदत संपली आहे तर २५० हुन अधिक पुलांवरून वाहतूक करणे धोकादायक ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील धोकादायक स्थितीत असलेल्या पुलांच्या दुरुस्तीबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, तसेच शासनाने पुलांवरील प्रवास सुरक्षित होईल व दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात आली आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) सदर घटनेच्या अनुषंगाने दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ च्या शासन परिपत्रकाद्वारे सा.बां.विभागाच्या अखत्यारीतील पुलांचे नियतकालिक परिरक्षण करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(२) राज्यात एकूण ६७८ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले व सदर स्ट्रक्चरल ऑडिटच्या प्राप्त अहवालांनुसार राज्यात ०८ पुल जड वाहतुकीस धोकादायक असल्याने निदर्शनास आले आहे. तथापि, सद्य:स्थितीत दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने सदर पुलांवरून अवजड वाहतूक धोकादायक असल्याचे पुलांच्या दोन्ही बाजूस सावधानीचा इशारा (cautionary sign) दर्शविणारे फलक लावण्यात आले आहेत.

(३) महालेखाकार यांचेकडून सन २०१८-१९ मध्ये पुलांचे निष्पादन लेखापरीक्षा (Performance Audit of bridges) करण्यात आले आहे. सदर लेखापरीक्षा अहवाल सन २०२० मध्ये प्राप्त झाला आहे.

(४) व (५) महालेखाकार यांचेकडून सन २०१८-१९ मध्ये पुलांचे निष्पादन लेखापरीक्षा अहवालात नमूद केलेली पुल दुरुस्ती संदर्भातील स्थिती ही सन २०१६ मधील असून सद्य:स्थितीत आवश्यकतेनुसार पुलांची दुरुस्ती करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत पुल वाहतुकीकरीता सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहेत.

(६) राज्यात सद्य:स्थितीत ०८ पुल जड वाहतुकीस धोकादायक असून त्यापैकी ०५ पुलांची कामे अर्थसंकल्पात मंजूर असून त्या पुलांची पुनर्बांधणी करणेत येत आहे. ०१ पुलाची दुरुस्ती प्रगतीत आहे. उर्वरित ०२ पुलांचे कामांचे दुरुस्तीचे काम निधी आवश्यतेनुसार करण्याचे नियोजन आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य मागासवर्ग आयोग स्थापन करण्याबाबत**

**(११) * १०५३६ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणारा महाराष्ट्र शासनाचा 'सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग कायदा २०१८' मा.सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिनांक ५ मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास रद्द केल्यानंतर राज्य मागासवर्ग आयोग स्थापन करुन मराठा आरक्षणासाठी आवश्यक कार्यवाही करण्यास शासनाकडून अक्षम्य विलंब झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा समाजाला शिक्षणामध्ये इतर मागासवर्गाप्रमाणे आरक्षण देणे, मराठा समाजासाठी जिल्हा स्तरावर वसतिगृह उघडणे, अण्णासाहेब पाटील महामंडळाला भरघोस निधी उपलब्ध करुन द्यावा, मराठा समाजातील तरुणांना कर्ज सुविधा उपलब्ध करुन द्यावी, सारथी संस्थेची कार्यालये प्रत्येक महसुली विभागात सुरु करावीत या मागण्यांवरही शासनाने सकारात्मक निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अभ्यास करुन आरक्षण टिकवण्यामधील त्रुटी दूर करण्याबाबत आणि पुन्हा आरक्षण मिळवण्याबाबत राज्य शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण प्रकरणी दिनांक ५ मे,२०२१ रोजी दिलेल्या अंतिम आदेशान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) आरक्षण अधिनियम, २०१८ अवैध ठरवून मराठा आरक्षण रद्द केले आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ च्या निर्णयाची समीक्षा करण्यासाठी दिनांक ११ मे, २०२१ च्या शासन निर्णयान्वये माजी न्यायाधीश श्री.दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली समीक्षा समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक ४ जून, २०२१ रोजी शासनास अहवाल सादर केलेला आहे. समितीच्या शिफारशीनुसार मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल केलेली असून सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे.

समितीच्या शिफारशीनुसार राज्य शासनाने दाखल केलेली पुनर्विलोकन याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ मे, २०२१ च्या निर्णयात मराठा आरक्षणासंदर्भात व्यक्त केलेले मत/ नोंदविलेली निरीक्षणे यांच्या अनुषंगाने मराठा समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाची माहिती संकलित करण्यासाठी/ अभ्यास करण्यासाठी एका नवीन आयोगाची स्थापना करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षण रद्द केले असल्यामुळे तुर्तास मराठा समाजास शिक्षणामध्ये आरक्षण देता येत नाही.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांना लागू असून सन २०१९-२०२० मध्ये ३६५८४ विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ३१ जुलै, २०१८ अन्वये राज्यात डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनेखाली नोंदणीकृत संस्थांना

वसतिगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाड्याने देणे अशा स्वरुपाची योजना सुरु केली आहे. याअंतर्गत १३ जिल्यामधील वसतिगृहे उभारण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, सातारा (कराड), सांगली (मिरज), कोल्हापूर, नाशिक (२ वसतिगृहे), औरंगाबाद (२ वसतिगृहे), बीड, लातूर, अमरावती व नागपूर या १४ ठिकाणी वसतिगृहांकरीता संस्था व इमारती अंतिम झाल्या आहेत. या वसतिगृहामध्ये २,२३४ मुले व १,४५५ मुली अशी एकूण ३,८६९ इतकी प्रवेश क्षमता आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातर्फे मराठा समाजातील मुला-मुलींना उद्योग व्यवसायासाठी वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजना राबविण्यात येत आहे. महामंडळास रुपये १८२५ कोटी इतक्या निधीचे वाटप सन २०१८ पासून झालेले असून महामंडळास आवश्यकतेनुसार आणखी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. आतापर्यंत २७९२४ लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेतला असून रुपये १३४.२६ कोटी रुपयांची प्रतिपूर्ती करण्यात आलेली आहे. तसेच, महामंडळामार्फत सद्य:स्थितीत सुरु असलेली व्याज परताव्याची योजना, केंद्र व राज्य शासनाच्या तत्सम योजना व महामंडळाची जिल्हा यंत्रणा यांचा एकत्रित अभ्यास करुन मराठा समाजाच्या मुला-मुलींना थेट कर्ज योजनेबाबत महामंडळाच्या संचालक मंडळामार्फत मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन मधील तरतुदीप्रमाणे उचित निर्णय घेण्यात येणार आहे.

सारथी संस्थेची विभागीय कार्यालये पुणे, कोल्हापूर, नाशिक, अमरावती, नागपूर, औरंगाबाद व लातूर या ठिकाणी सुरु करण्यात येत असून त्यासाठी जमीन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ च्या निर्णयाविरुध्द राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल केलेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर पुनर्विलोकन याचिका फेटाळल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ मे, २०२१ च्या निर्णयात मराठा आरक्षणासंदर्भात व्यक्त केलेले मत/ नोंदविलेली निरीक्षणे यांच्या अनुषंगाने मराठा समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाची माहिती संकलित करण्यासाठी/ अभ्यास करण्यासाठी एका नवीन आयोगाची स्थापना करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील स्मार्ट सिटी प्रकल्पग्रस्तांना घरे व जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१२) * ११०४९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील भरतवाडा,पारडी,पुनापूर या भागात ९,७३० एकर क्षेत्रात स्मार्ट सिटी हा महत्वकांक्षी प्रकल्प उभारला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाकरिता अनेकांची जागा व घरे गेली असून अनेकांना त्याचा मोबदला व घरे मिळालेली नाहीत तसेच जागेचे मोजमापही झालेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार सदर प्रकल्पग्रस्तांना त्यांची घरे व जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित क्षेत्राधिष्टीत विकास या घटकांतर्गत मौजा पारडी, भरतवाडा, पूनापूर व भांडेवाडी येथील १,७३० एकर क्षेत्रामध्ये शासनामार्फत नगररचना परियोजना मंजूर करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) १) मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर स्मार्ट सिटी यांचेकडून कळविण्यात आल्यानुसार सदर नगररचना परियोजनेंतर्गत प्रस्तावित रस्त्यांची विकास कामे नागपूर विशेष उद्देश वहनामार्फत करण्यात येत आहे.

२) सद्य:स्थितीत ज्या रस्त्याच्या लगत प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण होवून मोबदला अनुज्ञेय झाला आहे, अशा ठिकाणी रस्त्यांची विकासकामे सुरु करण्यात आलेली आहेत. उर्वरीत प्रस्तावित रस्त्यांच्या ठिकाणी सर्वेक्षण व मोजमाप करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

३) प्रस्तावित रस्त्याच्या विकासकामांमुळे बाधित होणाऱ्या मिळकती/जागेची मोजणी होवून नागपूर विशेष उद्देश वहनाच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणानुसार प्रकल्पबाधितांना मोबदला देण्यात येत आहे.

४) मौजा पुनापूर येथे बेघरांच्या गृहनिर्माणासाठी (हौसिंग फॉर डिसहाऊस्ड) आरक्षित असलेल्या जागेवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सदनिकांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

-----------------

## मुंबई ते सिंधुदुर्ग या दरम्यानच्या ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पाच्या बांधकामाबाबत

**(१३) * १०७७८ श्री.अनिकेत तटकरे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ४१६७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते नागपूर समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर कोकणाच्या विकासासाठी मुंबई, रायगड व सिंधुदुर्ग या जिल्हयांना जोडणारा ४०० कि.मी.लांबीचा ग्रीनफिल्ड महामार्ग बांधण्याचा निर्णय माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांनी घोषित केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळ पायाभूत समितीने या प्रकल्पास मंजूरी दिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याबाबतचा शासन निर्णय त्याच दिवशी निर्गमित केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामार्ग प्रकल्पाचे कामासाठी एकूण किती जमीन संपादित करावी लागणार असून कामाची सुरुवात केव्हापर्यंत करण्यात येणार आहे व महामार्गाचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे तसेच त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे,

(४) असल्यास, सदर ग्रीनफिल्ड महामार्गाच्या बांधकामाबाबत शासनाचे नियोजन काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय अभिभाषणात दिनांक १४ मार्च, २०२० रोजी कोकण द्रुतगती महामार्ग बांधकाम करण्याचे घोषित केले होते.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक २५ ऑगस्ट २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळ पायाभूत समितीने या प्रकल्पास मंजूरी दिली असून, त्याबाबतचा शासन निर्णय खाक्षेस-२०२१/प्र.क्र.२४७/ रस्ते-८, दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ अन्वये निर्गमित केला आहे.

(३) सदर प्रकल्पासाठी तांत्रिक अभियांत्रिकी व वित्तीय सुसाध्यतांसह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली असून, सर्व्हे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम म.रा.र.वि. महामंडळांतर्गत प्रगतीत आहे.

(४) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ४ भागांमध्ये प्रकल्प तांत्रिक सल्लागारांची नेमणुक करण्यात आली असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. तद्नंतरच बांधकामाचे नियोजन करता येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहराभोवतीच्या कचरा केंद्रातून निघणाऱ्या दूषित पाण्यामुळे (लिचड) शेतीचे नुकसान होत असल्याबाबत

**(१४) * १०६०३ श्री.अंबादास दानवे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ४४१६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने शहराभोवती चिखलठाणा, पडेगाव, हर्सुल व कांचनवाडीत दोन वर्षापूर्वी उभारलेल्या कचरा केंद्रातून सततच्या पावसामुळे निघणारे दूषित पाणी (लिचड) आसपासच्या शेतात वाहत जाऊन पिकांचे प्रचंड नुकसान होत असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दूषित पाणी (लिचड) मुळे विहिरी, बोअरवेल ला देखील दूषित पाणी येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे लिचडचे प्रमाण वाढल्यामुळे पिकांचे नुकसान झाले त्याचबरोबर परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने चिखलठाणा कचरा प्रक्रिया केंद्रातील काम संतप्त शेतकऱ्यांनी बंद पाडले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, तदनुसार यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

चिखलठाणा घनकचरा प्रक्रिया केंद्रावर माहे ऑगस्ट व माहे सप्टेंबर,२०२१ या कालावधीमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे प्रक्रिया केंद्रावरील लिचेड टँकमध्ये पावसाचे पाणी टँकच्या क्षमतेपेक्षा जास्त भरले गेले. त्यामुळे काही प्रमाणात सदर लिचड मिश्रीत पाणी शेतकऱ्यांच्या शेतात गेले.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर (जि.लातूर) शहरास उजणी जलाशयातून पाणीपुरवठा करण्याबाबत

**(१५) * १०३४० श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर (जि.लातूर) शहरास मोठ्या प्रमाणात पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असल्याने उजनी जलाशयातून शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन योजना मंजूर करण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमुळे लातूर शहरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात या योजेनेचा फायदा होणार असून या योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर योजना लवकरात लवकर मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) लातूर शहरास सद्य:स्थितीत मांजरा धरण या स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

लातूर शहरास अधिक शाश्वत स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने उजनी धरण व माजलगाव धरण या दोन स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्याच्या सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आल्या होत्या.

त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने लातूर शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी उजनी जलाशय उद्भव गृहीत धरुन योजनेची प्राथमिक आखणी केली होती.

तथापि, लातूर शहराचा समावेश गोदावरी खोऱ्यात येत असल्यामुळे प्रथम कृष्णा पाणी तंटा लवादाचे निर्णयातील अटी व शर्ती विचारात घेता उजनी प्रकल्पातून लातूर शहरासाठी पाणी वापर अनुज्ञेय ठरत नाही.

-----------------

## ठाणे व मुंबई शहरात फेरीवाला धोरणांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१६) * १०७३८ श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या महिला सहाय्यक आयुक्त व त्यांच्या सुरक्षा रक्षकावर फेरीवाल्याने हल्ला केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने फेरीवाल्यांना शिस्त लागावी म्हणून फेरीवाला धोरण राबविण्याचा निर्णय १० वर्षांपूर्वी घेतला असून मात्र अद्याप या धोरणांची अंमलबजावणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फेरीवाला धोरण आखण्याबाबतच्या समितीत लोकप्रतिनिधींच्या समावेशाबाबत शासनाकडून स्पष्टता नसल्याने सदर धोरण प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१८ मध्ये महानगरपालिकेने याबाबत राज्य शासनाच्या नगरविकास विभागाला पत्र पाठविले आहे परंतु अद्यापपर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ठाणे शहरात घडलेली दुर्दैवी घटना भविष्यात रोखण्यासाठी मुंबई शहरात तातडीने फेरीवाला धोरण आखण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी कासार वडवली नाका, ठाणे येथील रस्त्यावर अनधिकृत व्यवसाय करणारे फेरीवाले/हातगाड्यांवर अतिक्रमण विरोधी पथकामार्फत कार्यवाही करत असताना महिला सहायक आयुक्त व त्यांच्या अंगरक्षकावर फेरीवाल्याने हल्ला केल्याची बाब खरी आहे.

(२), (३), (४), (५) व (६) हे खरे आहे. तथापि, केंद्र शासनाने पदपथ विक्रेते (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ लागू केलेला असून राज्य शासनाने, महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका

संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिध्द केलेले आहेत.

तद्नंतर सदर अधिनियमातील कलम ३८(१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियम) (महाराष्ट्र) योजना, २०१७ दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी योजना प्रसिध्द केली आहे.

पथविक्रेता अधिनियम २०१४, नियम व योजना यांमधील तरतुदींच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन)(महाराष्ट्र) नियम, २०१६ मध्ये नगर सेवकांचा पथविक्री समितीमध्ये समावेश करण्याबाबत तरतूद नाही. या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## झरी (जि.यवतमाळ) तालुक्यामध्ये एम.पी.बिरला सिमेंट प्रकल्प अवैधरित्या उभारला जात असल्याबाबत

**(१७) * १०५०८ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी (जि.यवतमाळ) तालुक्यातील मुकुटबन, पिंपरडवाडी व येडशी गावातील खाजगी शेत जमिनीवर तसेच पैनगंगा नदी खोऱ्यातील ४६७ हेक्टर वन जमिनीवर एम.पी.बिरला सिमेंट प्रकल्प अवैधरित्या उभारला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकल्पामुळे या क्षेत्रातील वन जमिनीवरील हजारो वृक्षांची कत्तल केली जाणार असून त्यामुळे वन्य प्राण्यांसह मानवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाबाबत वन विभागाकडे कोणताही उल्लेख नसल्याने वन जमिनीवर बेकायदेशीररित्या अतिक्रमण करुन वन कायद्याचा भंग केला असल्याने या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१), (२) व (३) हे खरे नाही, तथापि, मे. रिलायन्स सिमेंट लिमिटेड (बदलले नाव- RCCPL Private Ltd.) यांच्या सिमेंट प्रकल्पासाठी मौ.पिंप्रडवाडी, हिरापूर, गोविंदपूर, ता.झरीजामणी, जि.यवतमाळ येथील ४६७.४५ हे. वनजमीन वळतीकरणास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाने दिनांक १२/०९/२०१७ रोजी अंतिम मान्यता प्रदान केली आहे.

सद्य:स्थितीत वनजमीन हस्तांतरीत झालेली नसून वृक्षांची तोड अथवा अतिक्रमण झालेले नाही. प्रस्तुत प्रकरणी वनभंग झालेला नसून वन्यजीव मंजूरीचा प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव / राज्य वन्यजीव मंडळाच्या परवानगीकरीता प्रलंबित आहे.

तसेच, या प्रकल्पातील १०४.७२ हे. खाजगी जमिनीपैकी मौ. पिंप्रडवाडी येथील ४१६ झाडे वनविभागाच्या परवानगीने तोडण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हातील मुरबाड, शहापूर व अंबरनाथ तालुक्यात वन विभागाच्या हद्दीत आग लागून वनसंपत्ती नष्ट झाल्याबाबत

**(१८) * १०८१७ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नढई (ता.मुरबाड, जि.ठाणे) वन विभागाच्या हद्दीत आग लागल्याचे तसेच अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील हाजीमलंग पट्ट्यातील मांगरुळ भाग व अंबरनाथ पश्चिमेतील खामकरवाडी, बदलापूर येथील शिरगाव टेकडीचा भाग या वन विभागाच्या हद्दीत आग लागल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील वन विभागाच्या हद्दीतील जंगलांना दोन महिन्यांत ५० वेळा वणवे लागल्याच्या घटना माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वणव्यामुळे मौल्यवान वनसंपत्ती व दुर्मिळ पशुपक्षी, सरपटणारे जीव नष्ट झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहापूर व अंबरनाथ येथील वन विभागाच्या हद्दीत दरवर्षी आगी लावण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रारी करुनही वनसंपत्तीचे रक्षण करण्याचे दृष्टीने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) माहे जानेवारी २०२१ मध्ये नढई मुरबाड ठाणे येथील वनविभागाच्या हद्दीमध्ये आग लागलेली नाही. माहे जानेवारी २०२१ मध्ये नढई ता.मुरबाड येथील खाजगी क्षेत्रावर आग लागली होती.

मांगरुळ नियतक्षेत्राच्या हद्दीमध्ये खामकरवाडी लगत कं.नं. ८२४ मध्ये वणवा लागल्याचे निर्दशनास आलेले होते.

बदलापुर येथील शिरगाव टेकडीचा भाग हा वनविभागाच्या हद्दीत, माहे जानेवारी २०२१ मध्ये वनवणव्याच्या घटना निर्दशनास आलेला आहे.

(२) शहापुर वनविभागात माहे एप्रिल व माहे मे, २०२१ या महिन्यामध्ये २३ ठिकाणी वनवणव्यांच्या घटनांची नोंद झालेली असून, १९.५०० हे. क्षेत्रावर वणवा लागलेला आहे.

(३) सदरचा वणवा हा जमिनीलगतची आग (Ground Fire) या प्रकारातील असून, या मध्ये वाळलेले गवत व झाडांचा पानगळ झालेला वाळलेला पाला पाचोळा जळुन नष्ट झालेला आहे. या वणव्यामध्ये मौल्यवान वनस्पती, दुर्मिळ पशु पक्षी, सरपटणारे जीव जळुन नष्ट झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) अशा प्रकारच्या वनवणव्याच्या घटना निर्दशनास येताच भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये तात्काळ गुन्हा नोंदवुन गुन्हयाच्या तपासाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येते.

(५) शहापुर वनविभागातील, वनपरिक्षेत्रातील क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी हे गस्त करीत असताना २ घटना निर्दशनास आल्या असून २ आरोपी पकडुन त्यांचे विरुध्द भारतीय वन अधिनिय १९२७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या वन वणव्याच्या घटना निदर्शनास येताच तात्काळ भारतीय वन अधिनियम १९२७ मधील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करुन प्रकरणी गुन्हयाची चौकशी क्षेत्रिय अधिकारी यांचे मार्फत करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील देवदा जवळील दिना नदीवर पुल बांधण्याबाबत

**(१९) * १०८७० श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील नक्षलप्रभावी भागातील चामोर्शी ते एटापल्ली-घोट-रेगडी मार्गावरील देवदा जवळील दिना नदीवर पुल नसल्याने सदर परिसरातील नागरिकांना आष्टी-आल्लापली-एटापल्ली असा ११२ कि.मी. अंतर प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक ०१/०९/२०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देवदा जवळील दिना नदीवर पुल झाल्यास प्रवास कमी होऊन अवघ्या ६८ कि.मी. अंतरावर येणार असल्याने सदर पुल बांधकामास तातडीने मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकित पुलाचे काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## सातारा-लातूर राष्ट्रीय महामार्गाच्या प्रलंबित असलेल्या कामाबाबत

**(२०) * ११२४४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा-लातूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ चे काम केंद्र-राज्य शासनाच्या आर्थिक तरतुदीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पासून सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा-लातूर महामार्गावर टेंभुर्णी-अकलूज व अकलूज माळशिरस या टप्प्यात महामार्गावर पुलांची कामे अपूर्ण आहेत तर काही ठिकाणी रस्ता खोदून ठेवल्याने अपघात होत असल्याच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलांची अपूर्ण कामे तसेच खोदून ठेवलेल्या रस्त्यांची कामे पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पुलांची व खड्डे भरण्याची कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे.

| काँक्रिटीकरण | एकूण लांबी | पूर्ण लांबी - ५१.९० कि.मी. | |
|---|---|---|---|
| मोठे पुल | एकूण ३ | २ प्रगतीत | १ अपूर्ण |
| लहान पुल | एकूण १० | ८ पूर्ण | २ अपूर्ण |
| मोऱ्या | एकूण ९८ | ८३ पूर्ण | १५ अपूर्ण |

सदर महामार्गाच्या लांबीपैकी अकलूज ते टेंभूर्णी व अकलूज माळशिरस हा टप्पा १७.१६ कि.मी.चा असून १२.९६ कि.मी. लांबी पूर्ण झाली आहे. उर्वरीत ४.९६ कि.मी.लांबीमध्ये स्थानिकांनी रस्ता वहिवाट रुंदीबाबत वाद निर्माण करुन रस्त्याच्या कामास विरोध केला आहे. त्यामुळे या लांबीतील रस्त्याचे काम तसेच, १ मोठा पुल, १ छोटया पुलाचे बांधकाम हे सदर पुलांच्या जोडरस्त्यासाठीचे भूसंपादन अद्याप पूर्ण न झाल्याने नविन पुलाचे काम हाती घेता आले नाही.

(३) सदर ठिकाणी स्थानिक शेतकऱ्यांनी भूसंपादनाचा प्रश्न उपस्थित केल्यामुळे व केलेल्या भूसंपादनास काही शेतकरी सहमत नसल्यामूळे/ विरोधामुळे सदर कामे अपूर्ण आहेत. सद्य:स्थितीत उपलब्ध रूंदीमध्ये कामे करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नरखेड (जि.नागपूर) वनक्षेत्र परिसरातील वन्य प्राण्याचे संरक्षण करण्याबाबत

**(२१) * ११२६३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील बानोर वनक्षेत्र परिसरामध्ये बिबट्याची शिकार करुन बिबट्याचे शिर १०० मीटर अंतरावर टाकण्यात आल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वन्य प्राण्याची हत्या करणाऱ्यांवर कारवाई करुन वन्य प्राण्यांचे संरक्षण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) नागपूर वन विभागातील नरखेड वनपरिक्षेत्रातील बानोर नियतक्षेत्रातील बानोर ते थडपवनी रोडच्या बाजुला १ बिबट (नर) मृतावस्थेत आढळून आला असून प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०३/१०/२०२१ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी प्रचलित तरतूदीनुसार चौकशी अधिकारी यांचेमार्फत १० संशयीत व्यक्तींना चौकशीसाठी बोलविण्यात आले होते. तसेच सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल महनगरपालिकेच्या पाच कंत्राटी सॅनेटरी इन्स्पेक्टरने गैरव्यवहार केल्याबाबत

**(२२) * ११३१९ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिकेने कोरोना काळात नियमांची पायमल्ली करणाऱ्या दुकानदार रहिवासी तसेच फेरीवाल्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी नेमलेल्या पाच सॅनेटरी इन्स्पेक्टरने दंडाच्या पावतीमध्ये हजारो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार सदर पाच दोषी सॅनेटरी इन्स्पेक्टर यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) पनवेल महानगरपालिका परिक्षेत्रात नियमांची पायमल्ली करणाऱ्या दुकानदार, रहिवासी तसेच फेरीवाल्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी नेमलेल्या एक सॅनेटरी इन्स्पेक्टर व चार सफाई कर्मचारी यांनी दंडाच्या पावतीमध्ये गैरव्यवहार केल्याची बाब निदर्शनास आल्याचे पनवेल महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकरणी पनवेल महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून या घटनेमध्ये दोषी आढळून आलेल्या संबंधित कंत्राटी तत्वावर असणाऱ्या सॅनेटरी इन्स्पेक्टर व सफाई कर्मचारी यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे.

तसेच भविष्यात अशा प्रकारच्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील दंडाच्या वसूलीकरीता राष्ट्रीयकृत बँकेच्या हॅन्ड हेल्ड डिवाईस प्रक्रियेचा अवलंब करण्यात येत असल्याचे पनवेल महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरेगांव (जि.सातारा) नगरपंचायतीअंतर्गत विकासकामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ११३६२ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव (ता.कोरेगांव, जि.सातारा) नगरपंचायतीअंतर्गत करण्यात आलेल्या विकासकामांमध्ये पुर्वी केलेली कामे नव्याने केली आहेत असे दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे प्लॅन व इस्टीमेटनुसार झालेली नसून शांतीनगर गटर्स बांधकाम करणे, आझाद चौक ते बनसोडे घर गटर्स बांधकाम करणे, स्वच्छ सर्व्हेक्षण - २०१९-२०२० व २०२०-२०२१ योजनेंतर्गत रंगरंगोटी केलेल्या एकाच कामाचे देयक दोनदा काढण्यात येणे, नगरपंचायतीमार्फत विविध कामांसाठी कॉन्ट्रक्ट दिले जाणे, त्यामध्ये कामासाठी घेण्यात येणारे कर्मचारी व प्रत्यक्ष कामाला असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येमध्ये तफावत आढळून येणे, कोरेगांव शहरासाठी एक वर्षापासून मंजूर असलेले फिल्टरेशन प्लॅन्टचे कामास वर्क ऑर्डर देण्यात येणे, मुख्याधिकारी यांनी निधी इतरत्र वापरणे, कोरेगांव शहरामध्ये जमा होणारा कचरा घंटा गाड्यांमार्फत गोळा करुन निवारा शेडमध्ये जमा करणे या गोष्टीसाठी शासनाने आजपर्यंत कोट्यवधी रुपयांचे अनुदान दिले आहे तसेच कोणतीही प्रक्रिया न करता ठेकेदाराचे देयके

वेळोवेळी अदा केली जात असणे, कोरेगांव नगरपंचायतीस घनकचरा गोळा करणेसाठी ७ घंटा गाड्या खरेदी करतांना ज्या कंपनीचे टेंडर होते, त्या पध्दतीने गाड्यांची खरेदी करण्यात येणे अशा प्रकारे नगरपंचायत प्रशासनाने लाखो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोरेगांव नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी व अन्य संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रश्न भाग-२ मध्ये नमूद काही बाबींसंदर्भात नगरपंचायत कोरेगांव व जिल्हाधिकारी, सातारा यांना तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांनी चौकशी केली असून अंदाजपत्रके, तांत्रिक मंजूरी, प्रशासकीय मंजूरीनंतरच कामे सुरु झाल्याचे, दोनदा देयके प्रदान झाले नसल्याचे तसेच निधी इतरत्र वळविला नसल्याचे त्यांना आढळून आले आहे.

फिल्टरेशन प्लॅन्टबाबत आधी स्ट्रक्चरल ऑडिट करुन घ्यावे व सुधारित अंदाजपत्रक सादर करावे, असे जिल्हाधिकारी, सातारा यांनी नगरपंचायतीस कळविले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. अद्याप कार्यारंभ आदेश (Work Order) देण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक आणि अनधिकृत इमारतींबाबत

**(२४) * ११९८४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक आणि अनधिकृत इमारतींचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून हा प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक आणि अनधिकृत इमारतींचे प्रश्न सोडविण्याकरीता उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन करण्याचे निर्देश मा.नगरविकास मंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशानुसार समिती स्थापन झाली आहे काय, त्यानुसार धोकादायक आणि अनधिकृत इमारतींचे प्रश्न सोडविण्याकरीता पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्याच्या उद्देशाने शासनाने उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे अधिनियम, २००६ पारित केला असून, सदर अधिनियमाची सक्षमपणे अंमलबजावणी होण्यामध्ये अडचणी येत असल्याने, यासंदर्भात मा.मंत्री, नगरविकास यांचेकडे दिनांक ०७/०७/२०२१ रोजी संबंधितांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये उक्त अधिनियमाची सक्षमपणे अंमलबजावणी होण्याअनुषंगाने येणाऱ्या अडचणींबाबत अभ्यास करुन अहवाल सादर करण्याकरिता समिती गठीत करण्याचे निदेश मा.मंत्री, नगरविकास यांनी दिले असून, त्यानुसार अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांचे अध्यक्षतेखालील समिती दिनांक २७/०७/२०२१ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे. पुढील कार्यवाही समितीमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या अनुदानित प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या प्रश्नांबाबत

**(२५) * ११११४४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका अखत्यारितील अनुदानित प्राथमिक शाळांमधील शिक्षक अतिरिक्त झाल्यानंतर नवीन शाळेत समायोजन होईपर्यंत शिक्षकांची सेवा खंडीत केली जाते तसेच मागील पाच वर्षे रिक्त जागा असतानाही शिक्षकांचे तात्पुरते समायोजन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिरिक्त शिक्षकांचे कायमस्वरूपी समायोजन करुन त्यांची नियुक्तीपासूनची सेवा पेन्शनसाठी ग्राह्य धरण्यात येईल काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या अल्पसंख्याक अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये आरटीई कायद्याचे उल्लंघन करून ४० पटाची सक्ती केल्यामुळे २० विद्यार्थ्यांचा अनुदानित शिक्षणाचा हक्क हिरावला गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदानित प्राथमिक शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे डीसीपीएस अथवा एनपीएस खाते न उघडण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, महानगरपालिकाच्या अनुदानित प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या प्रश्नांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबई महानगरपालिका अखत्यारितील अनुदानित प्राथमिक शाळांमधील शिक्षक अतिरिक्त झाल्यानंतर नवीन शाळेत समायोजन होईपर्यंत शिक्षकांची सेवा खंडीत केली जात नाही. तसेच, पाच वर्षे शिक्षकांच्या रिक्त जागा ठेवण्यात आलेल्या नाहीत. सदर रिक्त जागांवर प्रतिवर्षी शाळांकडून प्राप्त माहितीनुसार पटसंख्ये अभावी अतिरिक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे तात्पुरते समायोजन करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे, कर्मचाऱ्यांच्या मूळ शाळेत सेवानिवृत्ती, मृत्यू, राजीनामा अशा कारणांमुळे पद उपलब्ध झाल्यास कर्मचाऱ्यास पुन्हा मूळ शाळेत समायोजित करण्यात येते. असे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सेवानिवृत्ती वेतनाबाबत खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांची शासन मान्य निवृत्ती वेतन योजना क्र.एसएएस/पेंशन/६६७, दिनांक ३१/१०/१९९७ अन्वये प्रसारित करण्यात आलेली असून त्याप्रमाणे अनुज्ञेय निवृत्तीवेतन लाभ देण्यात येत आहेत. सदर योजनेनुसार शाळा १००% अनुदानावर आल्यापासूनची सेवा सेवानिवृत्तीसाठी ग्राह्य धरण्यात येते. सद्य:स्थितीत, २०% अनुदानापासूनची सेवा सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी कार्यन्वित आहे. असे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे

(३) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी प्राथमिक अनुदानित अल्पसंख्यांक शाळांतील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्क हिरावला गेला नाही. असे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांतील दिनांक ०५/०५/२००८ रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि दिनांक ०५/०५/२००८ नंतर अनुदानावर आलेल्या शाळांतील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) लागू करण्याबाबत कार्यवाही सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिका मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांतील कर्मचारी सन १९९७ पूर्वी पटसंख्ये अभावी अतिरिक्त झाल्यास सदर कर्मचाऱ्याची सेवा शाळास्तरावर समाप्त करण्यात येत होती. सद्य:स्थितीत अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे दुसऱ्या अनुदानित शाळेत/ महानगरपालिका शाळेत समायोजन करण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेला मान्यता मुदतवाढ असेपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन देणे, अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षकांना शिक्षण सेवक योजना लागू न करणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती देण्याबाबत, शिक्षण सेवक/ शिक्षकेतर कर्मचारी यांचा ३ वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी वरिष्ठ वेतनश्रेणी/ कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबत, १८० दिवसांसाठी बालसंगोपन रजा मंजूर करण्याबाबतची

कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, यासारख्या अन्य शिक्षकांच्या प्रश्नाबाबत कार्यवाही केली आहे वा करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या शासकीय सेवांमधील सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात नेमण्यात आलेल्या समितीबाबत

**(२६) * १०५८५ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या शासकीय सेवांमध्ये नोकर भरती करताना देण्यात येणारे विविध संदर्भ, सामाजिक आरक्षण तसेच समांतर आरक्षण निश्चित करण्यासाठी शासनाने प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील विविध बाबींसह आरक्षणासंदर्भात दाखल झालेले विविध दावे, याचिका व शासनाने त्यासंदर्भात काढलेल्या विविध आदेशांचा अभ्यास करणे तसेच मा.न्यायालयाच्या आदेशानुसार शासन निर्णयात कोणते बदल करणे आवश्यक आहे, या बाबींसंदर्भात राज्य शासनाला शिफारस/अहवाल सादर करण्याचे प्रस्तुत समितीवर बंधन घालण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रधान सचिव, (सेवा) यांचे अध्यक्षतेखालील अभ्यासगटात श्री.सुमंत भांगे, श्रीमती मनिषा कदम, गीता कुलकर्णी, सु.मो.महाजन व टि.वा.करपते इत्यादी सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर समिती स्थापनेसंदर्भातील शासन निर्णय प्रत्यक्षात केव्हा निर्गमित करण्यात आला व त्याबाबत कोणकोणते निकष वा अटी घालण्यात आल्या आहेत व समितीने किती कालावधीत आपला अहवाल/शिफारशी शासनास सादर करण्याबाबत समितीला तत्संबंधित शासन आदेशानुसार कळविण्यात आले आहे, तसेच आतापर्यंत समितीच्या किती बैठकी पार पाडल्या आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) व (२) सामाजिक व समांतर आरक्षण संबंधित निर्णयाचे एकत्रिकरण करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११/०८/२०२१ च्या शासन निर्णयान्वये अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे.

सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार शासन निर्णयात सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत व आरक्षणाबाबतच्या सर्व शासन निर्णयांचे एकत्रिकरण करण्यासाठी सदर अभ्यासगट मार्गदर्शन करेल.
(३) होय.
(४), (५) व (६) अभ्यासगटाच्या स्थापनेबाबत दिनांक ११/०८/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या सदर शासन निर्णयानुसार अभ्यासगटाची कार्यवाही सुरु असून सदर अभ्यासगटाची पहिली बैठक दिनांक १२/११/२०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती.

-----------------

## नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या भुखंड विक्रीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२७) * १११६६ श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या मालकीचा सीटी सर्व्हे क्र.३४२२, क्षेत्रफळ ५४३८ चौ.फूट हा कोट्यवधी किंमतीचा भुखंड महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या संगनमताने केवळ रुपये ३८,८४७/- एवढ्या किंमतीत एका राजकीय पक्षाचे भवन बांधण्यासाठी विक्री करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेचे पत्र क्र.६७७९, दिनांक १६/१०/१९७६ रोजीच्या पत्रानुसार सहाय्यक संचालक, नगररचना व मुल्य निर्धारण विभाग, नांदेड यांनी निर्देशित केलेल्या त्या वेळच्या जागेचे बाजारमुल्य रुपये ३५,४८०/- असल्याचे पत्र क्र.डी.ओ.२६५४ (ए), दिनांक २७/१०/१९७६ अन्वये कळविण्यात आले होते परंतु सदर भुखंडाचा सध्याचा बाजार भाव कोट्यवधी रुपये असून उक्त खरेदीखत व्यवहार क्रमांक २२१२/२०२०, दिनांक २७/१०/२०२० रोजी वा त्या सुमारास बाजार मुल्यांकन रुपये १,८४,५०,००० असे दाखवून त्याप्रमाणे त्याचे दुय्यम निबंधक कार्यालयाकडे मुद्रांक शुल्क भरणा करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडे एकूण ४४ वर्षानंतरही रुपये ३८,८४८/- भरण्यात येवून सध्याचे बाजारमुल्य पाहता सदर भूखंड हा किरकोळ किंमतीत महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांशी आर्थिक संगनमत करुन तसेच महानगरपालिकेची व शासनाची फसवणूक करुन खरेदी करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील कलम ९२(१) अन्वये प्राप्त अधिकारान्वये संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी दिनांक १२/०५/१९७७ व दिनांक २२/०९/१९७७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने तत्कालीन नगरपरिषदेच्या मालकीची अनुक्रमे ४७७५ चौ.फूट व ६६५ चौ.फूट अशी एकूण ५४४० चौ.फूट जागा नगररचना व मूल्य निर्धारण विभागाने ठरवून दिलेली रक्कम रुपये ३८,८४७/- चा भरणा करुन अध्यक्ष, जिल्हा काँग्रेस कमिटी, नांदेड यांना दिनांक २०/०६/१९७७ रोजी ताब्यात देण्यात आली.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिडको, नवी मुंबई यांच्याकडून वितरित झालेल्या भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत

**(२८) * १०३५० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको, नवी मुंबई यांच्याकडून वितरित झालेल्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याची बाब दिनांक ३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने वितरित केलेल्या भूखंडावर झालेले अतिक्रमण सदर भूखंडधारकांना हटवावे लागत असून सदर अतिक्रमण हटविण्यास सिडको असमर्थ ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे ज्या मूळ मालकाच्या जमिनी सिडकोमध्ये गेल्या आहेत व त्यांच्या भूखंडावर अतिक्रमण झाले आहे अशा मूळ मालकांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने सिडको यांच्याकडून वितरित झालेल्या भूखंडावर झालेले अतिक्रमण काढून मूळ मालक व भूखंडधारक यांना उचित न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

नवी मुंबई शहर विकसित करण्याकरीता ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील ९५ गावांची जमीन नवीन शहरे विकास प्राधिकरण या नात्याने सिडकोने संपादित केली आहे. संपादित जमिनीवर विकास आराखडा तयार करुन पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्यानुसार भुखंडांचे नियोजन करुन रहिवासी, वाणिज्य, सामाजिक सेवा, इ. प्रयोजनासाठी भुखंड वितरित करण्यात आलेले आहेत.

सिडकोकडून वितरित करण्यात आलेल्या भुखंडाचा ताबा संबंधितांना दिल्यानंतर भुखंडाच्या संरक्षणाची व विकासनाची जबाबदरी भुखंडधारकाची असते.

तसेच जे भुखंड वितरित झालेले नाहीत अशा भुखंडांवर अनधिकृत बांधकाम /अतिक्रमण झाल्यास सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागाकडून तसेच नियोजन प्राधिकरण म्हणुन संबंधित महानगरपालिकेकडुन महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार निष्कासन मोहीम राबविण्यात येऊन वेळोवेळी तपासणी केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरे मिळण्याबाबत

**(२९) * १०९३३ डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वांसाठी घरे या केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेचे यंदाचे अखेरचे वर्ष असून लाभार्थीच्या यादीतील १० लाख ९८ हजार ६२६ घरांच्या उद्दिष्टांपैकी १ लाख २० हजार ३८५ घरकुलांना मंजूरी देणे बाकी असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील ६० हजार ५६ लाभार्थींकडे स्वत:ची जागा नसल्याने या महत्वाकांक्षी योजनेतून खरे लाभार्थी बेघर राहिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर लाभार्थ्यांच्या जागेचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) राज्यात दिनांक ०९ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत राज्यासाठी १९ लाख ४० हजार घरकुल निर्मितीचे उद्दीष्टे निश्चित करण्यात आले आहे. आतापर्यंत या

योजनेंतर्गत राज्यातील ११६१ प्रकल्पासाठी ११,१३,४८१ घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) मंजुरी दिली आहे. त्यापैकी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS) ९,६९,६२८ घरकुले आहेत. सदर योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या व कार्यान्वित घरकुलांची संख्या ३,५९,७५५ इतकी आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या घटक क्र. ४ BLC करीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार लाभार्थ्यांना स्वत:च्या मालकीची जमीन असणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय सेवेतील पदोन्नतीतील रद्द केलेल्या आरक्षणाबाबत

**(३०) * १०४४३ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने पदोन्नतीची सर्व पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार सेवा ज्येष्ठतेनुसार भरण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द आव्हान दिले गेले असून हे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाब मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असतानाही शासनाने पदोन्नतीमधील ३३ टक्के पदे खुली करण्याला मागासवर्गीय संघटनांनी आक्षेप घेतला असून मा.सर्वोच्च न्यायालयात निर्णय लागेपर्यंत पदोन्नतीतील आरक्षण सुरू ठेवावे, अशी मागणी शासनाकडे केली आहे काय,

(४) असल्यास, या मागणीवर शासनाने निर्णय घेतला आहे काय तसेच मा.सर्वोच्च न्यायालयातील निर्णय लवकरात लवकर व्हावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) पदोन्नतीतील आरक्षण रद्द करणाऱ्या मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ०४/०८/२०१७ च्या निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. तसेच, पदोन्नतीच्या कोटयातील मागासवर्गीयांच्या राखीव जागा रिक्त ठेवता येणार नाहीत, असे कायदेशीर अभिप्राय शासनास प्राप्त झाल्यामुळे दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व १०० टक्के पदे सेवा ज्येष्ठतेनुसार भरण्याचे आदेश दिले आहेत.

पदोन्नती आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८/०१/२०२१ च्या सुनावणीत उपस्थित केलेल्या १० मुद्यांवर सुनावणी पूर्ण झालेली असून प्रकरण निकालासाठी राखून ठेवण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील सिडकोनिर्मित धोकादायक इमारतीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(३१) * १०६७५ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील सिडकोनिर्मित धोकादायक इमारतीचा पुनर्विकास करण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने सात वर्षापूर्वी घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचा पुनर्विकास एफएसआयच्या माध्यमातून करण्याचा निर्णय घेऊनही अदयाप सदर धोकादायक इमारतीची पुर्नबांधणी झाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन शासनाने परवानगी देऊनही अदयाप धोकादायक इमारतीची पुनर्बांधणी न होण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार सदर इमारतीची पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सिडको निर्मित धोकादायक, मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणी/पुनर्विकासाबाबत नवी मुंबई महापालिकेच्या तत्कालीन विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम ४६(३) मधील फ़ेरबदलास, शासन नगरविकास विभागाकडील दिनांक ०४/०२/२०१५ रोजीचे अधिसुचनेन्वये मंजूरी प्रदान करण्यात आली होती व सदर सुधारित विनियमामध्ये अशा इमारतींचे पुनर्विकासाकरीता कमाल २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे बाबतची तरतूद करण्यात आली होती.
(२) व (३) नाही, अशी बाब नाही.

वरील (१) मधील सुधारणेनुसार मंजूर तरतूदीचे अनुषंगाने सिडको निर्मित धोकादायक, मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणी/पुनर्विकासाकरीता महापालिकेकडे प्रस्ताव प्राप्त झाले असून, अशा काही प्रस्तावांना महापालिकेने मंजूरी प्रदान केलेली आहे.

(४) व (५) नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सिडकोनिर्मित धोकादायक मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणी करीता महापालिकेच्या तत्कालीन विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ४६(३) / परिशिष्ठ (सहा) अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाशी व कोपरखैरणे विभागातील काही सह गृहनिर्माण संस्था/ अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन यांचेकडून नवी मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये महापालिकेतर्फ़े बांधकाम परवानग्या देण्यात आलेल्या आहेत व सध्यस्थितीत मंजूर परवानगीप्रमाणे विकासासंबंधी संबंधितांकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे, शासनस्तरावरून चौकशी करणे अथवा विलंब होत असल्याची बाब लागू होत नाही.

तथापि, शासन नगरविकास विभागाने दिनांक ०२/१२/२०२० रोजीचे अधिसुचनेद्वारे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून ती दिनांक ०३/१२/२०२० पासून अंमलात आली आहे. सदर नियमावली नवी मुंबई महानगरपालिकेस देखील लागू आहे. सदर नियमावलीचे नियम १०.१०.२ मध्ये सिडको निर्मित धोकादायक/ मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाकरीता कमाल ३.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबतची तरतूद असून आता सदर तरतूदी अंतर्गत अशा इमारतींचे पुनर्बांधणी/पुनर्विकासाकरीता महापालिकेस प्रस्ताव करण्याची मूभा विकासकांना आहे.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेतील आरोग्य विभागासह विविध विभागातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२) * १०५६३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये मागील २० वर्षांसून कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या सेवानिवृत्तीमुळे कमी होत असून उर्वरित कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानूसार ५७१६ पदाच्या आकृतीबंधास मान्यता दिली असून सेवा प्रवेश व सेवा वर्गीकरण नियम २१ या नियमास दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या आरोग्य विभागासह विविध विभागातील कर्मचाऱ्यांची कमतरता विचारात घेता सदर पदे तात्काळ भरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) औरंगाबाद महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येते. शासनाने दिनांक १५/०२/२०२१ च्या आदेशान्वये महानगरपालिकेसाठी ५७१६ पदांचा सुधारित आकृतिबंध मंजूर केला आहे. या आकृतिबंधानुसार काही संवर्गामध्ये तसेच पदांमध्येही वाढ झालेली आहे.

याबाबत मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्याकडून बिंदुनामावली तपासून प्रमाणित करण्याची कार्यवाही औरंगाबाद महानगरपालिकेकडे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंडणगड व खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शासकीय विश्रामगृह इमारतीची पुनर्बांधणी करणेबाबत

**(३३) * ११३९४ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड व खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शासकीय विश्रामगृह इमारतीच्या पुर्नबांधणीच्या (बांधकाम करणे) अंदाजपत्रकास मान्यता देऊन निधी उपलब्ध करणेबाबत दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मंडणगड व खेड तालुका येथील शासकीय विश्रामगृहाच्या इमारतीच्या पुर्नबांधणीकरीता निधी उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) होय, खरे आहे.
(२) मंडणगड येथील विश्रामगृह इमारतीच्या पुनर्बांधणीबाबत निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

खेड येथील विश्रामगृहाचे काम सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असून सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## किनवट (जि.नांदेड) शहरातील हुतात्मा गोंड राजे शंकर शहा रघुनाथ शहा यांच्या खुल्या व्यासपीठाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३४) * ११३२४ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट (जि.नांदेड) शहराचे वैभव असलेले हुतात्मा गोंड राजे शंकर शहा रघुनाथ शहा यांच्या खुल्या व्यासपीठाची दुरवस्था झाली असून या ऐतिहासिक मैदानाला अतिक्रमणाने व्यापले असल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी व्यासपीठाची दुरुस्ती व सुशोभिकरण करुन अतिक्रमण हटविण्याची मागणी येथील नागरिकांनी नगरपरिषदेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हुतात्मा गोंड राजे शंकर शहा रघुनाथ शहा व्यासपीठाचे बांधकाम मोडकळीस आले आहे, ही बाब खरी आहे.

सदर जागेवरील यापूर्वी झालेले अतिक्रमण नगरपरिषदेने निष्कासित केले असून, सद्य:स्थितीत त्या जागेवर अतिक्रमण नाही.
(२) हे खरे नाही.

(३) नगरपरिषद विकास योजना सुधारित २००२ मध्ये सदर जागा आरक्षण क्र. १६ आठवडी बाजार या प्रयोजनार्थ आरक्षित आहे. सदर आरक्षणाच्या अनुषंगाने, निधी उपलब्धतेनंतर विकसित करण्याची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन व सेवाउपदानाची रक्कम मिळाली नसल्याबाबत

**(३५) * ११६११ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) येथील श्री.प्रमोद कुलकर्णी हे सेवानिवृत्त होऊन सुमारे दीड वर्ष उलटूनही त्यांना सेवा निवृत्तीवेतन व सेवा उपदान रक्कम मिळाली नसल्याने त्यांना सदर रक्कम देण्याबाबत सन २०२१ मध्ये वा दरम्यान लोकप्रतिनिधी यांनी मा.नगरविकास मंत्री व प्रधान सचिव, नगरविकास-२ यांच्याकडे लेखी निवेदनाद्‌वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.कुलकर्णी यांना सेवा निवृत्तीवेतन व सेवा उपदान रक्कम देण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे कर्मचाऱ्यांना विहित मुदतीत सदर लाभ देण्यात यावा असे बंधनकारक असतानाही त्याचा भंग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार बेजबाबदार अधिकारी व यंत्रणा यांचेविरुध्द कारवाई करून श्री.कुलकर्णी यांना सेवानिवृत्तीनंतरचा लाभ मिळवून देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) श्री.प्रमोद कुलकर्णी, कार्यकारी अभियंता हे दिनांक २८/०२/२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत.

श्री.प्रमोद कुलकर्णी यांच्या कार्यकारी अभियंता पदावरील पदोन्नतीस सर्वसाधारण सभेची मान्यता नसल्याचे लेखापरीक्षा विभागाने आक्षेप नोंदविले आहेत.

त्यास अनुसरून श्री.कुलकर्णी यांच्या कार्यकारी अभियंता या पदावरील पदोन्नतीस कार्योत्तर मान्यता मिळणेकरीता सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर केले असता, सदर विषयावर चर्चा करून प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला आहे.

सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेने नव्वद दिवसात निकालात न काढल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण-२ मधील (स) तरतूदीनुसार शासनाचे निर्देश मिळणेसाठी शासनास प्राप्त झालेला आहे.

सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

सद्य:स्थितीत श्री.प्रमोद कुलकणी, कार्यकारी अभियंता यांना तात्पुरते निवृत्तीवेतन लागू करण्यात आले असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिका प्रशासनाकडून थकीत मालमत्ता करावर शास्ती लागू केल्याबाबत

**(३६) * १०२८४ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील कोरोनाच्या संकटामुळे सर्वसामान्यांची आर्थिक स्थिती पूर्णत: विस्कळीत झाली असताना अकोला महानगरपालिका प्रशासनाकडून थकीत मालमत्ता करावर दोन टक्के व्याज लागू करुन त्याची वसुली केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शास्ती माफी अभय योजनेचा ठराव अद्यापही महानगरपालिकेने राखून ठेवला असल्याने शास्ती वसुलीला महानगरपालिका प्रशासनाची संमती असल्याबाबतचा आरोप नागरिकांकडून व लोकप्रतिनिधींकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर थकीत मालमत्ता करावरील २ टक्के व्याज शास्ती रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कराधान नियम कलम ४१ अन्वये थकीत कराच्या रकमेवर २ टक्के शास्तीची आकारणी करण्याबाबत तरतूद आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कराधान नियम कलम ५१ अन्वये उपलब्ध तरतुदीनुसार आयुक्तांच्या दिनांक ०१ जुलै, २०२१ च्या आदेशानुसार दिनांक ०१/०४/२०२१ ते ३१/०७/२०२१ पर्यंत शास्ती माफी अभय योजना राबवण्यात आली. तद्नंतर आयुक्तांच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ च्या आदेशान्वये शास्ती (व्याज) माफी अभय योजनेस दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(३७) * १०७६१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर शासनास आदेश प्राप्त न झाल्यामुळे अनुसूचित जमाती सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी हे गत २१ महिन्यापासून निवृत्तीवेतनापासून वंचित असून निवृत्तीवेतनाच्या मागणीस्तव दिनांक २ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास सदर अधिकारी व कर्मचारी हे उपोषण करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल क्र. ८९२८/२०१५ अन्वये चेअरमन आणि व्यवस्थापक संचालकांविरुध्द श्री.जगदीश बळीराम बहिरा व इतर संबंधित यासंदर्भात दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयात केंद्र अथवा राज्य शासनाला कोणते आदेश दिले आहेत,

(३) असल्यास, राज्यातील हजारो अनुसूचित जमाती अधिकारी कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करून त्यांची वेतनवाढ व सेवानिवृत्ती वेतन लाभ संदर्भातील शासन निर्णयास दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना ११ महिन्याच्या अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) ऑर्गनाईझेशन फॉर राईट्स ऑफ हयूमन (ऑफ्रोह), महाराष्ट्र या संघटनेकडून असे कर्मचारी आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण करीत असल्याचे निवेदन दिनांक १७/०९/२०२१ रोजी शासनास प्राप्त झाले आहे.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. ८९२८/२०१५ (चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि इतर विरुध्द जगदीश बळीराम बहिरा व इतर) व इतर याचिकांमध्ये दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही, तसेच अशा कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन देय ठरत नाही, असा निर्णय दिला आहे.

(३) नाही.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ६ जुलै, २०१७ च्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय करावयाच्या सेवा विषयक बाबी संदर्भात तसेच अधिसंख्य पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर न करताच शासन सेवेतून नियत वयोमानानुसार अथवा स्वेच्छा सेवानिवृत्ती झालेल्या अथवा मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीविषयक लाभ अनुज्ञेय करावयाचे किंवा कसे याबाबत अभ्यास करुन शासनास शिफारशी करण्यासाठी दिनांक १५/०६/२०२० च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे. अभ्यास गटाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे.सोमा इंटरप्रायजेस प्रा.लि.व मे.जे.कुमार इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला कंत्राट दिल्याबाबत

**(३८) * ११०९६ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.सोमा इंटरप्रायजेस प्रा.लि.व मे.जे.कुमार इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनींना काळ्या यादीत टाकले असतानाही तसेच या कंपनींना अनेक कंत्राटांमध्ये आर्थिक दंड झालेला असताना व या कंपनींविरुध्द मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त झाल्या असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेने अनेक कामांची कंत्राटे सदर कंपनींना दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीला राष्ट्रीय कायदा न्यायाधीकपत्र (National Law Tribunal) मुंबई बेंच, (एमए क्रमांक २२७/२०१८) अन्वये दिनांक ८ एप्रिल, २०२१ पासून दिवाळखोरी/परिसमापन जाहीर करण्यात आले असतानाही मा.न्यायालयाच्या आदेशानंतरही सदर कंपनीला महानगरपालिकेने कंत्राट दिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या, काळ्या यादीत टाकलेल्या व दिवाळखोरी/परिसमापन जाहीर करण्यात आलेल्या कंपनींना कंत्राट बहाल करणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करण्यात आली आहे काय, या चौकशीतून काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मे.सोमा इंटरप्रायजेस प्रा.लि. या कंपनीस काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही. मे. सोमा इंटरप्रायजेस प्रा.लि. या कंपनीस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्प विभागामार्फत देण्यात आलेल्या ३ कंत्राटांपैकी दोन कामे सदर कंपनीने समाधानकारकरित्या पूर्ण केली असून, एक काम प्रगतीपथावर असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

मे.जे.कुमार इन्फ्रास्ट्रक्चर या नावाने कंपनी नोंदणीकृत नाही. तथापि, त्या नावाचे साधर्म्य असलेली कंपनी मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस या नावाने नोंदणीकृत असून, कंत्राटदार नोंदणी नियमावलीनुसार तिची विधीग्राह्यता दिनांक ०१/०६/२०१८ पर्यंत होती. तथापि, सदर कंपनीस दिनांक २४/०३/२०१७ पासून तीन वर्षांकरीता काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. सदर कंपनी २०१६ च्या कंत्राटदार नोंदणी नियमावलीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोंदणीकृत नाही व सदर कंपनीस कोणतेही कंत्राट देण्यात आलेले नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) मे.युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. दिनांक ८ एप्रिल, २०२१ पासून कोणतेही कंत्राट देण्यात आलेले नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारध ते पिंपळगाव रेणूकाई-धावड (ता.भोकरदन, जि.जालना) येथील रस्त्याच्या कामाबाबत

**(३९) * १०९६६ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील पारध ते पिंपळगाव रेणूकाई-धावड या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम दिनांक २९ जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भेगा पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून या रस्त्याच्या कामाचा दर्जा तपासून ठेकेदारावर कारवाई करुन या रस्त्याचे पुन्हा दर्जेदार काम करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) होय. हे खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्याचे काम माहे मे, २०२१ दरम्यान करण्यात आले आहे.
(२) व (३) सदर रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून साखळी क्रमांक ८/२०० ते ९/२०० या भागात डांबरी पृष्ठभागावर भेगा पडल्याचे निदर्शनास आले होते. ज्या लांबीमध्ये रस्ता खराब झालेला होता त्या लांबीमध्ये ठेकेदारामार्फत दुरूस्तीचे काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिका प्रशासनाने शुल्कात शंभर टक्के वाढीचा निर्णय घेतल्याबाबत

**(४०) * ११२९५ श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका नगररचना विभागाद्वारे नियोजन प्राधिकरण म्हणून बांधकाम विकास परवानगी देण्याकरिता शुल्क आकारले जाते, परंतु सन २०२०-२०२१ मध्ये महानगरपालिका प्रशासनाने सभागृहात सर्वसाधारण सभेची परवानगी न घेता परस्पर एमआरटीपी ॲक्ट सन १९६६ कलम १२४ बी अंतर्गत विकास शुल्कात शंभर टक्के वाढीचा निर्णय घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सभागृहाच्या मान्यतेशिवाय हेतुपुरस्सरपणे निर्णय घेतल्याने नागरिक या विकासकांवर मोठा आर्थिक भार लादला गेला आहे, तथा विकास शुल्क वाढीची प्रक्रिया रद्द होणेकामी सर्वसाधारण सभेने दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास ठराव मंजूर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सदर शुल्क वाढीची प्रक्रिया तात्काळ रद्द करण्याबाबत महानगरपालिका प्रशासनास निर्देश देणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाअंतर्गत (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान व (२) प्रजापती नगर ते लोकमान्य नगर या उन्नत मेट्रो मार्ग प्रकल्पास शासन निर्णय क्र.नासुप्र- ३३१३/प्र.क्र.४१/नवि- ०७, दिनांक ३०/०१/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. उक्त शासन निर्णयातील परिशिष्ठ क्र.-३ च्या अ.क्र.(ii) च्या अनुषंगाने अधिसुचित नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क १००% पर्यंत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यात तरतुद करणे व त्यानुसार वसुल होणारी वाढीव रक्कम अशा प्रकल्पासाठी वापरणेबाबत नमुद आहे. उक्त अधिनियमातील कलम १२४-ब नुसार विकास वा बांधकाम परवानगी प्रकरणी

आकारणी करावयाच्या विकास शुल्क आकारण्याबाबतची तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १२४(२-१अ) मध्ये राज्य शासनाने एक किंवा त्यापेक्षा अधिक महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प हाती घेण्याचा आपला इरादा जाहीर केला असेल त्याबाबतीत या अधिनियमातील कोणत्याही नियोजन प्राधिकरणाच्या किंवा नवीन नगरविकास प्राधिकरणाच्या अधिकारीतेखालील क्षेत्राच्या संबंधात पोट कलम (२) च्या तरतूदीन्वये बसविण्यात आणि वसूल करण्यात आलेल्या विकास शुल्क आकारात शंभर टक्क्यांनी वाढ करण्यात येईल, अशी तरतूद म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ मध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहे.

तसेच याबाबत नागपूर महानगरपालिकेने दिनांक २६/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये मेट्रो रेल्वे मार्गिकेच्या प्रकल्पास "महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प म्हणुन शासन निर्णय क्र.एमआरडी-३३१६/प्र.क्र.२४/(१)/नवि-७,दिनांक ३०/०६/२०१६ अन्वये घोषित करण्यात आलेला आहे. त्यामुळे अधिनियमाच्या कलम १२४ब (२-१अ) मधील तरतुदीनुसार अधिनियमाच्या कलम १२४ब(२) च्या तरतुदीन्वये बसविण्यात आणि वसुल करण्यात आलेल्या विकास शुल्कामध्ये अपेक्षीत १००% वाढ भूतलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक ३०/०६/२०१६ पासून नागपूर नियोजन प्राधिकरण क्षेत्रात दिलेल्या विकास परवानगीच्या अनुषंगाने वसुल करणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केलेले होते व याबाबत शासनाकडुन निर्देश प्राप्त होण्याची विनंती केलेली होती.

त्यानुसार शासनाने महानगरपालिकेस दिनांक ०३/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे कळविण्यात आले होते. "महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ ब (२-१अ) मधील तरतुदीनुसार अधिनियमाच्या कलम १२४ ब (२) च्या तरतुदीन्वये बसविण्यात आणि वसुल करण्यात आलेल्या विकास शुल्कामध्ये अपेक्षीत १००% वाढ भूतलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक ३०/०६/२०१६ पासून नागपूर नियोजन प्राधिकरण क्षेत्रात दिलेल्या विकास परवानगीच्या अनुषंगाने वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे कळविले आहे.

नागपूर शहराकरीता शासनाने नागरी वाहतूक प्रकल्प घोषित करून, उक्त नागपूर मेट्रो प्रकल्प उभारण्यासाठी कशा पध्दतीने आर्थिक स्त्रोत निश्चित करावे याबाबत दिनांक ३०/०१/२०१४ रोजीच्या निर्णयातील परिशिष्ट-

३ मध्ये नमूद मुद्दे विचारात घेवून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१२४ ब (२-१अ) मधील तरतुदीनुसार वसूल करावयाच्या विकास शुल्कात १००% वाढ करणेबाबतची कार्यवाही उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार करण्यात आलेली आहे. विकास शुल्कात केलेली वाढ रद्द करणेविषयी नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहाने दिनांक २२/०७/२०२१ रोजी ठराव क्र.१३७ पारीत केलेला असून सदर ठरावाची अंमलबजावणी न करता नागपूर मेट्रो प्रकल्पास नागपूर महानगरपालिकेचा देय वाटा महानगरपालिकेची विद्यमान आर्थिक स्थितीचा विचार करता मेट्रोकडे भरणा करणे अडचणीचे होणार असून, मेट्रो प्रकल्पाच्या विकासास अडथळा होणार आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहाने पारीत केलेला उक्त ठराव हा अधिनियम वा तद्न्वये देण्यात आलेल्या अधिकाराच्या विरूध्द असल्याने सदर ठरावाची अंमलबजावणी करणे योग्य नसल्यामुळे उक्त ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम-४५१ मधील तरतुदीनुसार विखंडीत करणेकरीता महानगरपालिका आयुक्तांनी पत्र क्र.मनपा/नरवि/१२५४, दिनांक २६/१०/२०२१ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(३) नाही.

महानगरपालिकेच्या सभागृहाने ठराव क्र.१३७ दिनांक २२/०७/२०२१ रोजी विकास शुल्कात केलेली वाढ रद्द करण्याबाबतचा ठराव विखंडीत करण्याबाबत महानगरपालिका आयुक्तांनी दिनांक २६/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे. उक्त प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## मुंबईतील गोरेगांव रेल्वे स्थानकाकडून एस.व्ही. रोडला जोडणाऱ्या स्कायवॉकवरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(४१) * १०४५५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव रेल्वे स्थानकाकडून एस.व्ही. रोडला जोडणाऱ्या स्कायवॉकवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्कायवॉकचा वापर चूल पेटवणे, भांडी घासणे, प्रात:विधी आदि करीता अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींकडून होत असून या स्कायवॉकवरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आणि पादचाऱ्यांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत असतानाही उक्त प्रकरणी स्थानिक पोलिसांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर स्कायवॉकवरील अतिक्रमण हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) गोरेगांव रेल्वे स्थानकाकडून एस.व्ही. रोडला जोडणाऱ्या स्कायवॉकवर अनधिकृत, पक्के किंवा तात्पुरते बांधकाम नाही, तथापि, बेघर लोकांचा वावर आढळून आला असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) सदर स्कायवॉकचा वापर चूल पेटविणे, भांडी घासणे, प्रात:विधीकरीता केला जात नाही. तसेच, दिनांक २२/०९/२०२१ रोजी पावसाळ्याचे दिवस असल्याने, सदर स्कायवॉकवर आश्रित असलेल्या बेघर व्यक्तींवर पोलीस व बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दि प्रिव्हेन्शन ऑफ बेगींग ॲक्ट-१९६० नुसार संयुक्तिक कारवाई करण्यात आली असल्याचे गृह विभाग व बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव महानगरपालिकेच्या आव्हाणे शिवारातील घनकचरा प्रकल्पाच्या डीपीआर मधील त्रुटींबाबत

**(४२) * १०४२४ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव महानगरपालिकेच्या आव्हाणे शिवारातील घनकचरा प्रकल्पाच्या कामाचा डीपीआर तयार करताना संबंधित अधिकाऱ्यांनी इतर महानगरपालिकांचा डीपीआर कॉपी-पेस्ट करून आणि त्याची योग्यता न तपासताच शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला असल्याची बाब दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरहू डीपीआर नामंजूर करून नवीन डीपीआर तयार करण्याच्या सूचना जळगाव महानगरपालिकेस दिल्याने या प्रकल्पाकरीता अतिरिक्त १८ कोटींचा खर्च वाढणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, त्यानुसार सदरहू प्रकल्पाचा डीपीआर तयार करताना अक्षम्य कसूर करणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) जळगाव महानगरपालिकेच्या रूपये ३०.७५ कोटी किंमतीच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास दिनांक ०१/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

त्यानंतर, सदर सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये महानगरपालिकेने प्रस्तावित केल्यानुसार रूपये ४९.६७ कोटी किंमतीच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास दिनांक १४/०५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाकरीता येणाऱ्या वाढीव खर्चास केंद्र शासनामार्फत अतिरिक्त निधी उपलब्ध होवू शकत नसल्याने सदर वाढीव खर्च महानगरपालिकेस प्राप्त १४ व्या वित्त आयोगांतर्गत निधी अथवा मनपाच्या स्वनिधीतून भागविण्याबाबत महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी संबंधितांकडून अहवाल मागवून त्यावर अभिप्राय सादर करणेबाबत राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र संचालनालय यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## मुंबईतील जलस्त्रोताचे पुर्नरुज्जीवन करण्याकरीता उपाययोजना करणेबाबत

**(४३) * १०४७१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरात सरासरीच्या तुलनेत अधिक पावसाची नोंद होत असून येथील प्रशासन किंवा कोणतीच यंत्रणा पावसाचे पाणी जमिनीत मुरुन जलसाठा वाढावा म्हणून कार्यान्वित नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील २० वर्षात मुंबईतील सुमारे ९० टक्के जलस्त्रोत चोरीला गेल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित यंत्रणेला माहिती देखील होणार नाही अशाप्रकारे जलस्त्रोत्र नष्ट करण्यात आले असून सदर प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर कारवाई अपेक्षित असतानाही संबंधित विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील अनेक वर्षात पाणी प्रश्नाबाबत महानगरपालिकेकडे एकूण १० समित्या नियुक्त करण्यात आल्या व सदर समित्यांनी तांत्रिक दृष्टीकोनातून अनेक उपाययोजना सुचविल्या परंतु महानगरपालिकेने त्यावर कोणत्याच प्रकारची अंमलबजावणी केली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईसारख्या शहरात भविष्यकाळात पाण्याची गरज लक्षात घेता मुंबईतील जलस्त्रोताचे पुर्नरुज्जीवन करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबई शहर आणि उपनगरात सरासरीच्या तुलनेत अधिक पाऊस होत असून, पावसाचे पाणी जमिनीत मुरुन जलसाठा वाढावा याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- सुधारीत विकास आराखडा २०३४ नुसार, दिनांक ०८/०५/२००८ पासून नवीन विकासाकरीता येणाऱ्या ५०० चौ.मी. किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या सर्व भूखंडांकरीता वर्षा संचयन व विनियोग करण्याची अट बंधनकारक करण्यात आली आहे.
- त्यानुसार इमारत बांधकामास मंजुरी देतांना वर्षा संचयन प्रकल्पाची बांधणी करण्याबाबतची अट ना-मंजुरीच्या अटी व शर्तीच्या प्रमाणपत्रात समाविष्ट करण्यात येते.
- वर्षा संचयन प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर झाल्याची खात्री केल्यानंतरच इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते.

(२) व (३) एखाद्या विकासकाने विकसित होत असलेल्या भूखंडावर विहीर बुजवण्याचा प्रयत्न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३ अन्वये कारवाई करण्यात येते.

तसेच एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने अथवा खाजगी मालकाच्या जागेमधील विहीर बुजवत असल्याचे किंवा बुजविली असल्याचे आढळून आल्यास योग्य ती कारवाई करण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबईतील पाणी प्रश्नाबाबत नियुक्त केलेल्या चितळे समितीच्या सन १९९४ च्या सूचना अहवालानुसार व शासनाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने “समान व २४x७ पाणी पुरवठ्याकरीता” स्थापन केलेल्या तज्ञ समितीच्या सूचना व अहवालानुसार कार्यवाही सुरु आहे.

चितळे समितीच्या अहवालानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने मध्य वैतरणा धरण प्रकल्प पूर्ण करुन कार्यान्वित केला आहे. तसेच पाणी पुरवठ्यातील गळती रोखण्यासाठी स्वतंत्र गळती अन्वेषण विभाग कार्यरत आहे. तसेच २०० एमएलडी क्षमता असलेला नि:क्षारीकरण प्रकल्प मनोरी येथे उभारण्याकरीता निविदा प्रक्रिया सुरु आहे. मुंबई शहराला भविष्यात अधिक पाणीपुरवठा करण्याकरीता गारगाई, पिंजाळ आणि दमणगंगा प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबतची व्यवहार्यता पडताळण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तज्ञ समितीच्या सूचना व अहवालानुसार, सहायक शोषण टाक्या, बुस्टर पंप बसविणे, स्काडा प्रणाली नुतनीकरण, नवीन जलमापके/प्रवाह मापके बसविणे, ग्राहक माहिती नुतनीकरण, मोठी गृहसंकुले व मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करणाऱ्या आस्थापनांची देखरेख, प्रभागांतील पाणीपुरवठा विभाग व नवीन प्रभाग यांचा अभ्यास, पाणी गळती रोखणे, पाण्याची नासाडी व चोरी रोखणे, पाण्याचा पुनर्वापर, पर्जन्य जलसंचयन व विनियोग, नवीन जलस्त्रोतांची निर्मिती इत्यादी अनेक सूचनांची अंमलबजावणी व कार्यवाही होत आहे. तसेच विविध सुधारणा कार्यक्रम/प्रकल्प हाती घेण्यात आले असून इतर सुधारणा कार्यक्रम/प्रकल्प कार्यान्वित करण्याकरीता अभ्यास व पडताळणी सुरु आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) अस्तित्वात असलेल्या खाजगी गृहनिर्माण संस्था/ मालमत्ताधारकांना वर्षा संचयन व विनियोग योजना राबविण्याबाबत उत्तेजन देण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्थापित केलेल्या वर्षा संचयन व विनियोग आणि पाणी बचत कक्षातर्फे प्रस्तावित योजनेचे संकल्पन विनामूल्य करुन देण्यात येते.

तसेच, इमारतीच्या आवारामध्ये नवीन कूपनलिका खणण्याची परवानगी देतांना वर्षा संचयन व विनियोग पध्दतीने इमारतीच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याने कूपनलिकेमार्फत भूजलाचे पुनर्भरण करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अट घालण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यासह राज्यात अतिवृष्टीमुळे पुलांचे व रस्त्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(४४) * १०८२६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बहुतांश भागात माहे जुलै, २०२१ व माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील लहान मोठ्या पुलासह साकव, मोऱ्या तसेच रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने पुल नादुरूस्त झाले आहेत तसेच रस्त्यावरची माती वाहून गेल्यामुळे रस्ते खचले असून काही ठिकाणी रस्त्यांवर खड्डे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार पडलेल्या व नादुरूस्त झालेल्या पुलांच्या व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये माहे जुलै, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ मध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होवून लहान मोठ्या पूलासह साकव, मोऱ्या तसेच रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.
(२) होय, हे ही खरे आहे.
(३) अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्ते व पुलांच्या दुरुस्तीचे प्राप्त प्रस्तावांना निकड, निधी व निकषांच्या अधीन राहून मंजूरी प्रदान करण्याचे नियोजन आहे. रस्त्यांची कामे तात्पुरती दुरुस्ती करुन रस्ते वाहतूकीस तात्पुरत्या स्वरुपात पूर्ववत करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेतील कोरोनामुळे मृत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(४५) * ११०६५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ४८६४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतील १८ कर्मचारी कर्तव्य बजावत असताना त्यांना कोरोनाचा संसर्ग होऊन त्यांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कोरोना योद्ध्यांना शासनाकडून अद्याप कोणतीही मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांच्या वारसांना पंतप्रधान कोविड कवच योजनेंतर्गत ५० लाखांचा विमा मिळावा यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या प्रस्तावांना मंजूरी देऊन मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना सदरील योजनेंतर्गत आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कोरोनाने मृत्यू पावलेल्या १८ कर्मचाऱ्यांपैकी श्री.सुबोध सोमकुंवर या पात्र कर्मचाऱ्यास रुपये ५०.०० लाख इतक्या विमा रकमेचे प्रदान न्यु इंडिया ॲशुरन्स कंपनीकडून करण्यात आले आहे.

उर्वरीत १७ मृत कर्मचाऱ्यांची सेवा कोविड रूग्ण सेवेशी प्रत्यक्ष निगडीत नसल्याचे दिसून आले.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील प्रमुख रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत

**(४६) * १०५९९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील काही प्रमुख रस्त्यांची झालेली दुरवस्था पाहून महानगरपालिकेने आपल्या निधीतून ३९ रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ३९ रस्त्यांच्या डांबरीकरणाकरीता ५७ कोटींचे अंदाजपत्रकही तयार करण्यात आले असून निविदा मात्र अद्याप प्रसिध्द करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदा प्रसिध्द झाली नसल्यामुळे उक्त ३९ रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निविदा प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) औरंगाबाद महानगरपालिकेने स्वनिधीतून ३९ रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामाचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदर रस्त्यांच्या कामाच्या अंदाजपत्रकास महानगरपालिकेची मान्यता अद्याप प्राप्त नसल्याने तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीमुळे निविदा प्रसिध्द केली नसल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## रत्नागिरी शहरातील मुरूगवाडी ते पंधरामाड येथील धूपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामाबाबत

**(४७) * १०७१३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी (जि.रत्नागिरी) शहरातील मुरूगवाडी ते पंधरामाड परिसरातील ग्रामस्थांना मागील अनेक वर्षे उधाणात जीव मुठीत धरून रहावे लागत असल्याने येथील ग्रामस्थांच्या सातत्याच्या मागणीमुळे शासनाने या धूपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामासाठी रूपये २ कोटी २० लाख मंजूर करण्यात आल्यानंतर सदर कामाचा अर्जुना अर्थ मुव्हिज कंपनीला ठेका मंजूर करण्यात आला व त्यानुसार माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वर्क ऑर्डर देण्यात आलेली असतानाही सुमारे २ वर्षाचा कालावधी उलटला असतानाही आजमितीस या धूपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामास सुरूवातच झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजमितीस सदरहू धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सुरू न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम विनाविलंब हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) सदरील कामास दिनांक ०१/११/२०१९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सदरील काम प्रगतीपथावर असून आजमितीस अंदाजित ५०% काम पूर्ण झाले आहे.
(२) माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आल्यानंतर कामास सुरुवात करण्यात आली होती. तथापि, कोव्हिड १९ विषाणू प्रादुर्भावामुळे संपूर्ण राज्यात टाळेबंदी लागू झाल्याने सदर कालावधीमध्ये काम बंद ठेवण्यात आले होते. तद्नंतर ठेकेदारास सूचना दिल्यानुसार आजमितीस ५०% काम पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) भुयारी मार्गाची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) * १०७९६ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील बेलवली पूर्व व पश्चिम भागात ये-जा करण्यासाठी असलेल्या भुयारी मार्गात बाराही महिने पाणी साचत असल्याकारणाने याठिकाणी वाहने अडकून वाहनांची व पादचाऱ्यांची प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रवाशांनी कुळगांव बदलापूर नगरपालिकेकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपालिका यांनी साचलेले पाणी काढण्यासाठी उपाययोजना करण्याचे व योग्य यंत्रणा वापरण्याचे आदेश देवूनही नगरपालिकेकडून याबाबत अद्याप कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती प्रवाशांची गैरसोय दुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टी झाल्याने सदर भुयारी मार्गात पाणी साचले होते. त्यामुळे वाहनांची व पादचाऱ्यांची गैरसोय झाली होती, अशी वस्तूस्थिती कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने कळविली आहे.
(२) अशा स्वरुपाच्या मौखिक तक्रारी नगरपरिषदेकडे प्राप्त झाल्याचे कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने कळविले आहे.
(३) व (४) नगरपरिषदेने या ठिकाणी साचलेले पाणी काढण्यासाठी ऑटो ऑपरेटींग मोटर बसविली असून पाणी साचल्यास याव्दारे तात्काळ पाणी काढले जाते. तसेच सदर ठिकाणी पंपींगची क्षमता वृध्दी करण्याचे प्रस्तावित असून येत्या पावसाळयापूर्वी यानुषंगाने कार्यवाही करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासन सेवेतील पदांच्या भरतीकरीता आवश्यक असलेली वयोमर्यादा वाढवून देण्याबाबत

**(४९) * ११२१४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना आणि मराठा आरक्षणामुळे एमपीएससी आणि सरळसेवा भरतीच्या जाहिराती न निघाल्याने स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी वयोमर्यादा ओलांडली असल्याचे निर्दशनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यसेवा पूर्व परीक्षेत किमान ५०० हून अधिक जागांवर भरती करण्यात येईल असा विश्वास तरुणांना असताना प्रत्यक्षात मात्र ३९० जागांची एमपीएससीने पूर्व परीक्षा सन २०२१ ची जाहिरात काढल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या ग्वाहीनंतरही त्यामध्ये ना जागा वाढल्या ना वयोमर्यादा वाढल्याने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या तरुणांना धक्का बसला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या विद्यार्थ्यांची एमपीएससीच्या संकेत स्थळावर आधीपासून नोंदणी आहे मात्र दोन वर्षांपासून जाहिराती अभावी ते अर्ज करू शकले नाही, पण आता वयोमर्यादा ओलांडली आहे अशा उमेदवारांना येणाऱ्या परीक्षांमध्ये अर्जाच्या दोन संधी देण्यात याव्यात अशी मागणी स्पर्धा परिक्षार्थींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने गॅजेट नोटिफिकेशन काढून वयोमर्यादा वाढवावी व आणखी जागा वाढवून उर्वरित पदांची भरती प्रक्रिया तात्काळ सुरू करावी तसेच ज्या विद्यार्थ्यांची एमपीएससीच्या संकेत स्थळावर आधीपासून नोंदणी आहे त्या उमेदवारांना अर्जाच्या दोन संधी वाढवून देण्याबाबतची मागणी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) होय.

(२) राज्यसेवा पूर्व परीक्षा - २०२१ च्या माध्यमातून राज्य शासन सेवेतील ३९० पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) कोरोना काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शासन सेवेतील पदभरतीकरीता स्पर्धा परीक्षांचे आयोजन करणे शक्य झाले नसल्याने, या स्पर्धा परीक्षांना बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांना परीक्षेची एक अतिरिक्त संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासन सेवेतील प्रवेशाकरीता वयोमर्यादेत वाढ देण्याची मागणी करण्यात आली आहे, ही बाब खरी आहे.

(६) याबाबत साधक-बाधक विचार करुन निर्णय घेण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील कचरा संकलनाच्या कंत्राटातील गैरव्यवहाराबाबत

**(५०) * ११२७२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने कचरा संकलनासाठी दोन वर्षापूर्वी एव्हीजी व बीव्हीजी या दोन कंपन्यांची नियुक्ती करुन शहराचे दोन पॅकेजमध्ये विभाजन केले, परंतु उत्तर पूर्व, दक्षिण नागपूरच्या आऊटर भागात एक-एक आठवडा कचरा गाडी येत नसल्याने नागरिकांकडून कचरा शहरातील रस्त्यावर, मोकळ्या भूखंडावर टाकण्यात येत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच कंपनीला देण्यात येणाऱ्या कंत्राटात महानगरपालिका आणि स्मार्ट सिटीच्या रक्कमेमध्ये तफावत असून या प्रकरणाची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश महापौरांनी दिले होते मात्र अद्यापी सदर प्रकरणी चौकशी अहवाल सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या कामाची चौकशी होणेबाबत

**(५१) * ११३६९ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम सन २०१० मध्ये सुरु करण्यात येवून ते सन २०१३ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून त्यामध्ये अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या असून सदर रस्त्याचे काम मंजूर आराखड्याप्रमाणे (प्लॅन आणि प्रोफाईल प्रमाणे) करण्यात आले नसल्याचे तसेच रस्त्याची लेव्हल, स्लोप, ग्रॅडीएंट इ. कामे नकाशानूसार न केल्यामुळे रस्त्यावर पाणी साठून खड्डे पडतात व अपघात होऊन अनेक दुर्दैवी घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या कामामध्ये आढळून आलेल्या त्रुटी प्रकरणी त्रयस्थ यंत्रणेमार्फत (Third Party) ऑडीट करण्यात येऊन सदर कामाची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी तेथील नागरिकांकडून व स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीअंती संबंधित कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण** : (१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील पुणे-सातारा भागातील सहापदरीकरणाचे एकूण १४०.३५० कि.मी. चे काम (कि.मी. ७२५.००० ते ८६५.३५० कि.मी.) जवळपास पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे. सदर प्रकल्पाच्या एकूण लांबीपैकी सुमारे १३५.६८ कि.मी. मधील सहापदरीकरणाचे काम काही स्ट्रक्चर्स व त्यांचे जोडरस्ते वगळता पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत काम प्रगतीपथावर असून लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सदरील कामास पुढील कारणांमुळे विलंब झाला असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे:-

अ) स्थानिक ग्रामस्थांकडून त्यांच्या वेगवेगळया मागणीनुसार पूलाची उंची/ रुंदी व स्थान याबाबत वेळोवेळी झालेला विरोध.

ब) रस्त्यावरील अडथळा ठरणारी झाडे तोडण्यासाठी/ स्थलांतरीत करण्यासाठी व वन क्षेत्रातील कामाकरीता उशीरा मिळालेली मंजुरी.

क) रुंदीकरणाच्या कामाच्या वेळी भूसंपादनातील अडचणी.

ड) महामार्गाच्या रस्त्यांअंतर्गत येणाऱ्या विविध धार्मिक स्थळांच्या स्थलांतरणाबाबत ग्रामस्थांचा असलेला विरोध.

इ) कंत्राटदाराच्या आर्थिक अडचणींमुळे प्रकल्पाच्या प्रगतीवर झालेला परिणाम

(२) हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी नमूद करुन सदर बाबत पुढीलप्रमाणे कळविण्यात आले आहे:-

सदर प्रकल्पाचे काम मंजूर करारनाम्यातील तरतुदीनुसार व MORT& H चे विनिर्देश तसेच IRC मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात येत असून प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या स्वतंत्र अभियंता यांचेमार्फत कामाचा दर्जा वेळोवेळी तपासण्यात येऊन त्यांनी अहवालाव्दारे सुचविलेल्या बाबींची पूर्तता कंत्राटदारामार्फत करुन घेण्यात येत आहे.

प्रकल्पाचे काम मंजूर आराखड्यानुसार, प्रोफाइल व लेव्हलनुसार कार्यान्वित होत असून सुरक्षीततेच्या दृष्टिने आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात येऊन काम प्रगतीपथावर आहे. सुरक्षीततेच्या अनुषंगाने

कंत्राटदारामार्फत वाहतूक व्यवस्थापन टीमद्वारे देखील देखरेख करण्यात येत आहे. त्यामुळे सदर रस्त्यावर झालेल्या अपघातांच्या दुर्देवी घटना वेगवान वाहने चालवल्यामुळे, लेनची शिस्त न पाळल्यामुळे, ड्रिंक ॲण्ड ड्राईव्ह वगैरे कारणांमुळे झाल्या असल्याचे स्वतंत्र अभियंता यांनी कळविले आहे.

(३) हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुदानित प्राथमिक शाळांना मान्यता देणेबाबत

**(५२) * ११२४२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनेक अनुदानित प्राथमिक शाळांना मागील ३ वर्षापासून महानगरपालिका प्रशासनाने अद्यापि शाळेची मान्यता दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा मान्यता न मिळाल्यामुळे सेवानिवृत्त शिक्षकांना मान्यता नसलेला कालावधी पेन्शनसाठी ग्राह्य न धरल्यामुळे शिक्षकांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार अनुदानित प्राथमिक शाळांना शाळेची मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांची मान्यता मुदतवाढ संपुष्टात आल्यानंतर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन अनुज्ञेय होत नव्हते.

यास्तव खाजगी प्राथमिक शाळेस मान्यता व अनुदान नोंदणी मुदतवाढ असेपर्यंतचा कालावधी, निवृत्तीवेतनासाठी अर्हकारी सेवा म्हणून ग्राह्य धरण्यास मंजुरी प्राप्त करण्यात आली असून, त्यानुसार सदर दावे निकाली काढण्यात येत आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांची मान्यता व अनुदान नोंदणी मुदतवाढ कालावधी संपुष्टात आला आहे. त्यांचे मान्यता मुदतवाढीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावामधील त्रुटींची शाळांकडून पुर्तता करुन घेऊन प्रशासकीय मंजूरी व तद्नंतर शिक्षण समितीची मंजूरी प्राप्त करण्यात येते. सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीकडे सादर करण्यात आलेल्या १०२ प्रस्तावांपैकी १४ प्रस्ताव मंजूर झाले आहेत. इतर प्रस्तावांवरील कार्यवाही सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## बीड नगरपरिषद हद्दीतील नादुरुस्त रस्त्यांच्या कामासाठी विशेष रस्ता अनुदान योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(५३) * १०३५७ श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषद हद्दीमधील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याची बाब दिनांक १ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नादुरुस्त व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या रस्त्यांच्या नूतनीकरणासाठी विशेष रस्ता अनुदानांतर्गत निधी उपलब्ध करून देणेबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.नगरविकास मंत्री यांना दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीनूसार बीड नगरपरिषद हद्दीतील नादुरुस्त रस्त्यांच्या कामासाठी विशेष रस्ता अनुदान योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बीड नगरपरिषद क्षेत्रातील महत्वाचे रस्ते खराब झाले असून त्यासाठी विशेष रस्ता अनुदान मंजूर करण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये केली आहे, हे खरे आहे.
(३) व (४) "नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान" योजनेंतर्गत शा.नि.क्र.नपावे-२०२१/प्र.क्र.२११/नवि-१६, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२१ अन्वये बीड नगरपरिषदे क्षेत्रातील विविध रस्त्यांच्या कामांसाठी रुपये ३.०० कोटी निधी मंजूर व वितरीत करण्यात आला आहे.

-----------------

## मुंबईतील प्रलंबित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(५४) * १०४४७ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विविध कारणांमुळे प्रलंबित असलेल्या सुमारे ५०० झोपडपट्टी पुनर्वसन योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ताब्यात घेणार असल्याची घोषणा मा.गृहनिर्माण मंत्री माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान यांनी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे ८०० प्रलंबित असलेल्या योजनांपैकी ५ टक्के योजनाही घोषणा केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या ताब्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्णत्वास नेण्याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) एकूण ३८१ झोपडपट्टी पुनर्वसन योजना विविध कारणांमुळे रखडलेल्या आहेत.

(२) व (३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून रखडलेल्या योजना पूर्ण करण्यासाठी ४ पर्याय सूचवले असून त्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिकेच्या हद्दीतील अनधिकृत मोबाईल टॉवरबाबत

**(५५) * १०२९२ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेच्या अखत्यारित येणाऱ्या अनेक मोबाईल कंपन्यांनी शहरात अनधिकृत मोबाईल टॉवरची उभारणी केली असून नुतनीकरण न करताच टॉवरच्या माध्यमातून सुविधा दिली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला मधील जनतेला शास्ती लागू करुन त्यांच्या मालमत्ता सील केल्या जात असताना मोबाईल कंपन्याकडून सन २०१३ पासून शुल्क जमा केले नसतानाही सील लावण्याची कार्यवाहीबाबत अकोला महानगरपालिकेकडून विलंब केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार चौकशीअंती मोबाईल कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

वसुली मोहीम राबविण्यासाठी अकोला महानगरपालिकेच्या सहायक नगर रचनाकार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. २३१ अनधिकृत मोबाईल टॉवर धारकांना नियमानुसार शुल्क वसुलीबाबतचे मागणीपत्र (डिमांड नोटीस) देण्याबाबत तसेच अन्य अनधिकृत मोबाईल टॉवर्सचे सर्वेक्षण करण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मच्छिमारांच्या विविध मागण्यासंदर्भात

**(५६) * १०७६६ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट येथील छत्रपती शिवाजी महाराज मासळी मंडई मधील मासळी व्यावसायिकांना न्याय द्यावा या मागणीसाठी मच्छिमार समाज बांधवांनी आझाद मैदान मुंबई येथे जन आक्रोश मोर्चा माहे ऑगस्ट, २०२१च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान काढला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई जिल्हा कोळी महिला विविध कार्यकारी सहकारी संस्था लिमिटेड या संस्थेला छत्रपती शिवाजी महाराज मंडई मध्ये कार्यालयासाठी, शीतपेटया ठेवण्यासाठी व शौचालयासाठी जागा देण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहे ऑक्टोबर, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेला छत्रपती शिवाजी महाराज मंडई मध्ये कार्यालयासाठी व शिल्लक राहिलेल्या मच्छीमार शीतपेट्या ठेवण्यासाठी जागा क्रमांक १७ आणि अतिरिक्त जागा एकूण सात शीतपेट्या व त्या ठेवण्यासाठी १६० चौ.फूट व अधिक ६४ चौ.फूट जागा चाळीस वर्षापासून देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मंडईच्या पुनर्विकासाचे काम चालू असून या ठिकाणी नवीन पत्राशेड बांधून सर्व जागाधारकांना महानगरपालिका जागा देणार असून मुंबई जिल्हा कोळी महिला विविध कार्यकारी सहकारी संस्था लि. या संस्थेला जागा देण्यात येणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज मंडई येथील मासळी विक्रेते अनधिकृतपणे ऐरोली/ मुलुंड पूर्व (ऐरोली टोल नाका) येथील जकात नाक्याच्या मोकळ्या भूखंडावर हलविण्यात आली असून सदर मंडई ऐरोली/ मुलुंड पूर्व (ऐरोली टोल नाका) येथील जकात नाक्याच्या मोकळ्या भूखंडावर हलविण्याबाबतची कारणे काय आहेत, तसेच सदर मंडई अचानकपणे हलविल्यामुळे स्थानिक भूमिपुत्र मच्छिमार बांधवांच्या मासेविक्रीच्या व्यवसायावर परिणाम झाला असून यामुळे मच्छिमारांमध्ये प्रचंड नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मच्छिमार संस्थानी मुंबईतील कोळीवाड्यांना गावठाणाचा दर्जा देण्यात यावा, थकित २४० कोटी रुपयांचे डिझेल परतावा त्वरीत देण्यात यावा, ओएनजीसीच्या सर्वेमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, मच्छिमार संस्थेला जागा देण्याबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे. असे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) होय, हे खरे आहे. असे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) होय, हे खरे आहे. असे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) हे खरे नाही. छत्रपती शिवाजी महाराज मंडईची इमारत तोडण्याच्या अगोदर ज्याप्रमाणे व्यवसायाची व्यवस्था होती त्यानुसार, नव्याने बांधण्यात येणाऱ्या तात्पुरत्या शेडमध्ये मुंबई जिल्हा कोळी महिला विविध कार्यकारी सहकारी संस्था लि. या संस्थेला देखील जागा देण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) छत्रपती शिवाजी महाराज मासळी मंडईची इमारत जीर्ण झाल्याने ती धोकादायक स्थितीत ठरल्याने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका (एल) क्र. ४३८२/२०२० मध्ये महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार सदर मंडई रिक्त करुन निष्कासित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर मंडईमधील अनुज्ञापत्रधारकांच्या व्यवसायाचे नुकसान होऊ नये व त्यांचा व्यवसाय चालू रहावा, या हेतूने किरकोळ अनुज्ञापत्रधारकांना मनपाच्या किरकोळ बाजार मंडईमध्ये अनुक्रमे १. मरोळ अंधेरी (पूर्व) येथील आठवडा बाजार, २. फोर्ट मंडई, ३. मिर्झा गालिब मंडई, ४. कुलाबा मंडई येथे तात्पुरत्या स्वरुपात व्यवसाय करण्याकरीता जागा देऊ केली होती. तसेच घाऊक मासळी व्यावसायिकांना ऐरोली येथील मोकळ्या भूखंडावर तात्पुरती शेड बांधेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपावर व्यवसाय करण्याकरीता कळविण्यात आले होते. त्यानुसार तेथे जवळजवळ २५ दिवस मासळी विक्रेते व्यवसाय करीत होते. मात्र नवी मुंबई येथील स्थानिक मच्छिमार व्यावसायिकांचा विरोध होत असल्याने व अनुज्ञापत्रधारक घाऊक मासळी विक्रेत्यांनी वारंवार विनंती केल्याने छत्रपती शिवाजी महाराज मंडईच्या (मूळ भूखंड) मोकळ्या जागी व्यवसाय करण्याची त्यांची विनंती मान्य करण्यात आली.

(६) कोळीवाड्यांना गावठाणाचा दर्जा देण्याबाबत अद्यापी निर्णय घेण्यात आलेला नाही. तथापी, कोळीवाड्यांच्या सिमांकनाबाबतची कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी दिनांक २०/११/२०१२ च्या महसूल विभागाच्या शासन निर्णयाणन्वये ७ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

मच्छिमार संस्थेला नव्याने उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या पत्राशेडमध्ये जागा देण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एमएमआरडीए लॅण्ड ॲण्ड इस्टेट निविदा प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेबाबत

**(५७) * ११०९२ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) एमएमआरडीए प्रशासनाने सुरक्षा रक्षकांसाठी एमएमआरडीए लॅण्ड ॲण्ड इस्टेट टेंडर क्रमांक २२४० दिनांक ४ नोव्हेंबर २०२० रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द केले असून या निविदा प्रक्रियेत अनेक गंभीर अनियमितता झाल्याची तक्रार मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी त्यांच्या दिनांक १२/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रश्नाधीन निवेदन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अभिलेखाची पडताळणी करुन शहानिशा करण्यात आली असून त्यामध्ये कोणतेही तथ्य आढळून आले नाही. सबब निविदा प्रक्रिया रद्द करण्याची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेस विकासकामांकरिता अनुदान अप्राप्त असल्याबाबत

**(५८) * १०६३६ श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतर्फे शासकीय अनुदानातून करण्यात येत असलेल्या अनेक विकास कामाचे अनुदान नागपूर महानगरपालिकेस प्राप्त झालेले नसल्याने ही कामे सुरू होऊनही निधीअभावी अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय मनपा २०१९/प्रकरण क्रमांक ११४/नवी१६, दिनांक ०३/०९/२०१९ अन्वये रुपये १५७ कोटींची कामे मंजूर करण्यात आली होती मात्र सदर निधी अद्‌याप प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सक्करदरा तलाव सौंदर्यीकरण, चांदमारी येथील रस्ता बांधणी, शुक्रवारी तलाव सौंदर्यीकरणाकरीता असे अनुक्रमे ९ कोटी, ३ कोटी व १९ कोटी चा निधी शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रलंबित निधी मिळणेकरीता मा.लोकप्रतिनिधी व महानगरपालिकेने शासनाकडे लेखी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित निधी वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे** : (१) व (२) सन २०१९-२० या आर्थिक वर्षात“महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई सुविधांचा विकास” या योजनेंतर्गत शासन निर्णय क्र. मनपा-२०१९/प्र.क्र.११४/नवि-१६ दिनांक ०३ सप्टेंबर, २०१९ अन्वये नागपूर महानगरपालिकेच्या रुपये १५७.५० कोटीच्या विकास कामांना मान्यता देण्यात आली होती.

त्यापैकी कार्यारंभ आदेश दिलेल्या, प्रगतीपथावर असलेल्या व पूर्ण झालेल्या कामांसाठी देय असलेली रक्कम रुपये ९३.९६ कोटी, नागपूर महानगरपालिकेकडे शिल्लक / अखर्चित असलेल्या शासन अनुदानातून खर्च करण्यास शासन आदेश क्रमांक मनपा-२०२०/प्र.क्र.१३७(भाग-१)/नवि-१६, दिनांक ०८ मार्च, २०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यामुळे, प्रस्तुत पूर्ण व चालू कामांसाठी शासन अनुदान उपलब्ध करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

(३) “भोसलेकालीन सक्करदरा तलावाचे सौंदर्यीकरण” या कामासाठी शा.नि. क्रमांक पूरक-२०१९/प्र.क्र.७७/नवि-१६, दिनांक ०५ ऑगस्ट, २०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता तसेच “प्रभाग क्र.२६ अंतर्गत चांदमारी रोडे, गिडोबा मंदिर ते बिडगांव टी पॉईंटपर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण या कामास शा.नि. क्रमांक मनपा-२०१९/प्र.क्र.१२३/नवि-१६, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये रुपये ३.९१ कोटीच्या कामास मान्यता देण्यात आली असून तत्कालिन परिस्थितीनुसार निधी वितरीत करण्यात आलेला नाही, हे खरे आहे.

“गांधीसागर तलाव तथा शुक्रवारी तलाव सौंदर्यीकरण करणे” या रुपये १४.९० कोटीच्या कामास शा.नि.क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/ नवि-१६, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी शासन हिश्याचा रुपये १२.०० कोटी निधी शा.नि.क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/ नवि-१६, दिनांक ०८ मार्च, २०१९ अन्वये वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित निधी नागपूर महानगरपालिकेने स्वनिधीतून उपलब्ध करणे क्रमप्राप्त आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) व (६) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय निधी, प्रत्यक्ष वितरणासाठी उपलब्ध होणारा निधी व मागण्या यांच्या अधीनतेने निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## गोरेगाव (मुंबई) येथील आरेमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा आणि भंगार उघड्यावर टाकले जात असल्याबाबत

**(५९) * १०४५७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील आरे परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा आणि भंगार सामान उघड्यावरच टाकले जात असल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कचरा, भंगारामुळे आरे परिसरात बिबळयाची भिती वाढली असून नुकतेच आरेमध्ये एका महिलेवर बिबळयाने हल्ला केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणत अस्वच्छता पसरली असतानाही आरे परिसरातील स्वच्छतेकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खेर आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी व पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार आरे परिसराची स्वच्छता करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) हे खरे नाही.

आरे गोरेगाव येथील आरे प्रशासनाच्या ताब्यातील एकूण क्षेत्रातील लोकवस्त्या, तबेले, कुरण क्षेत्र, रस्ते व अस्तित्वात असलेल्या इमरतींचे क्षेत्र वगळून केवळ ८१२ एकर क्षेत्र दिनांक १२/१०/२०२० रोजी राखीव वन म्हणून घोषित करण्यात आले आहे. आरेच्या उर्वरित क्षेत्राच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आरे प्रशासनाची आहे.

राखीव वन म्हणून घोषित करण्यात आलेल्या ८१२ एकर क्षेत्रामध्ये कचरा अथवा भंगार सामान उघड्यावर टाकले जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) आरे प्रशासनाच्या ताब्यातील युनिट क्रमांक ३ च्या परिसरातील मानवी वस्तीमध्ये बिबट्याने एका महिलेवर हल्ला केल्याची घटना निदर्शनास आली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे घोडबंदर (जि.पालघर) येथील 'अपना घर' प्रकल्पातील इमारतींच्या अनधिकृत बांधकामाबाबत

**(६०) * १०४२३ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घोडबंदर (जि.ठाणे) येथील 'अपना घर' प्रकल्पातील इमारतींना ७ माळ्यापर्यंत बांधकाम करण्याची परवानगी दिलेली असताना मे. सेव्हन

इलेव्हन कंन्स्ट्रक्शन कंपनीकडून प्रत्यक्षात २० माळ्यापर्यंत अनधिकृत बांधकाम करण्यात आले असल्याची गंभीर बाब दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीनूसार सदरहू ठिकाणचे अनधिकृत बांधकाम तातडीने निष्कासित करण्यासह अनधिकृत बांधकाम करणाऱ्या कंपनीवर तसेच दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील अपना घर प्रकल्पाच्या सर्व्हे क्र. २५/२, १११/१/१, १/२ व ११२/१ वरील ६ इमारतींना ९ मजल्यापर्यंत बांधकाम परवानगी देण्यात आली होती. तथापि, यातील ३ इमारतींमध्ये मंजूर बांधकाम परवानगीव्यतिरिक्त ३ ते ५ अनधिकृत मजले बांधल्याचे निदर्शनास आले.

तसेच सर्व्हे क्र. १११/२, ३, ४, ११२/२, ११८/१ व ११९/२ वरील ५ इमारतींना ७ मजल्यापर्यंत बांधकाम परवानगी देण्यात आली होती. तथापि, यातील ५ ही इमारतींमध्ये मंजूर बांधकाम परवानगींव्यतिरिक्त १ ते ५ अनधिकृत मजले बांधल्याचे निदर्शनास आले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) अनधिकृत बांधकाम प्रकरणी विकासकास नोटीस देण्यात आली. सदर नोटीशीविरूध्द विकासकाने मा.दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर मा.न्यायालयाने "जैसे थे" आदेश दिले.

तद्नंतर विकासकाच्या बांधकाम नियमाकुल करण्याच्या प्रस्तावाचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ अन्वये अनुक्रमे रुपये ३५,४९,१६८/- व रुपये ३४,३८,५१६/- इतक्या दंडनीय शुल्काचा भरणा करून घेऊन अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशकांच्या मर्यादेच्या बांधकाम नियमाकुल केल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील लोअर परळ येथील ना.म.जोशी मार्गावरील बी.डी.डी.चाळ पुर्नविकास मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

**(६१) * १०४६९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लोअर परळ येथील ना.म.जोशी मार्गावरील बी.डी.डी.चाळ पुर्नविकासाचा शुभारंभ करुन तीनहून अधिक वर्षे झाली असतानाही सदर प्रकल्पाचे काम अद्यापपर्यंत सुरु झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातील २०५ रहिवाशी वरळी येथील संक्रमण शिबिरात स्थलांतरित झाले असून शासन प्रकल्पाचे काम सुरु करत नसल्यामुळे उर्वरित रहिवाशी संक्रमण शिबिरात जाण्यास तयार नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळी येथील बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासाचे काम शासनाने खुल्या जागेत सुरु केले आहे. मात्र, ना.म.जोशी मार्ग येथील बी.डी.डी. चाळीच्या पुर्नविकासाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरळी येथील बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासाच्या धर्तीवर लोअर परळ येथील ना.म.जोशी मार्गावरील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

ना.म. जोशी मार्ग प्रकल्पातील २८० रहिवाशांनी म्हाडाच्या संक्रमण शिबिरात स्थलांतर केले असून, कायमस्वरूपी सदनिकेचा करारनामा करून, त्याच्या नोंदणीकरणानंतरच उर्वरीत रहिवाशी संक्रमण शिबिरात स्थलांतरण करण्यास तयार आहेत.

(३), (४) व (५) वरळी येथे मोकळा भूखंड उपलब्ध असल्याने २ विंगचे काम हाती घेण्यात आले आहे. तथापि, ना.म. जोशी मार्ग प्रकल्पामध्ये उपलब्ध मोकळ्या जागेवर एकाही इमारतीचे काम पूर्ण होऊ शकत नसल्याने तेथील चाळी रिकाम्या झाल्याशिवाय काम हाती घेता येणे शक्य नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील स्थापत्य कंत्राट (सीडब्ल्युसी) कामांतील निविदा प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(६२) * १०८४७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील स्थापत्य कंत्राट (सीडब्ल्युसी) कामांतील निविदा प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी अहवाल जाहीर करण्यात आला असून त्यामध्ये ६३ अभियंता/कर्मचारी यांना दोषी ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लहान रस्ते, गटारांची दुरूस्ती, लादीकरण व स्वच्छतेसाठी महानगरपालिका विभाग स्तरावर कामे केली जात असून विभागस्तरावर राबविण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेत अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने गैरव्यवहार होत असल्याने याप्रकरणी चौकशी करण्याकरीता महानगरपालिकेने उपायुक्त स्तरावर त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन वर्षांनंतर या समितीचा अहवाल स्थायी समितीत मांडण्यात आला असून चौकशी समितीने ८३ अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सी.डब्ल्यु.सी. कामातील ई-कोटेशन व अतारांकित निविदा संगणकीय कार्यप्रणालीमार्फत अपलोड करताना आढळुन आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द खात्यांतर्गत चौकशी करण्याकरीता महानगरपालिका आयुक्त

यांनी त्रिसदस्यीय चौकशी समितीची नियुक्ती केली होती. सदर त्रिसदस्यीय चौकशी समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालास महानगरपालिका आयुक्त यांनी मान्यता दिली. तदनुषंगाने, महानगरपालिका आयुक्त यांनी ६३ कर्मचाऱ्यांबाबत पारित केलेले आदेश/शिक्षादेश महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी त्रिसदस्यीय चौकशी समितीच्या अहवालानुसार चौकशीमध्ये खालील बाबी आढळून आल्या :-

एस.आर.एम. संगणकीय प्रणालीतून अतारांकित निविदा/ ई-कोटेशनचे बीड क्रीएट करताना ठराविक कंत्राटदारांना फायदा होण्याच्यादृष्टीने दुय्यम अभियंता यांनी बीड कमी कालावधीसाठी / काही बीडस रात्र कालावधीत क्रीएट केले व अशा बीडसना कार्यकारी अभियंत्यांनी मान्यता दिली. सदर ई-कोटेशनची जाहिरात सूचना फलकावर लावली नाही. तसेच, काही अभियंत्यांनी डिजीटल सिग्नेचरचा अनधिकृतपणे वापर केला.

काही बीडस महानगरपालिकेच्या/ महानगरपालिकेबाहेरील संगणकावर क्रीएट केले व त्याच संगणकावर कंत्राटदारांनी काही मिनिटांत/ सेकंदात प्रतिसाद दिला.

काही बीडस इतर प्रभागातील दुय्यम अभियंत्यांनी दुसऱ्या दुय्यम अभियंत्यांच्या युजर आयडीचा वापर करून क्रीएट केले.

तथापि, माहिती तंत्रज्ञान विभागाकडून युजर आयडी प्राप्त न होणे तसेच, कमी कालावधीसाठी बीडस क्रीएट केल्याची बाब लक्षात आल्यावर रद्द करण्यात आले.

उपरोक्त अनियमिततांच्या अनुषंगाने सकृतदर्शनी जबाबदार असणाऱ्या ८३ कर्मचाऱ्यांवर आरोपपत्रे बजाविण्यात आली व तद्नुषंगाने त्रिसदस्यीय चौकशी समितीने खात्यांतर्गत चौकशी करुन सादर केलेल्या चौकशी अहवालावर महानगरपालिका आयुक्त यांनी ८३ कर्मचाऱ्यांपैकी २० कर्मचाऱ्यांबाबत दोषमुक्तीचे आणि ५० कर्मचाऱ्यांबाबत किरकोळ स्वरूपाच्या शिक्षेचे आदेश पारित केले आहेत. उर्वरीत १३ कर्मचाऱ्यांबाबत जबर शिक्षेचे आदेश पारित केले आहेत.

तदनुषंगाने, सदर १३ कर्मचाऱ्यांवर 'कारणे दाखवा नोटिस' बजाविण्यात आल्या होत्या. या 'कारणे दाखवा नोटिस'च्या अनुषंगाने ११ कर्मचाऱ्यांचे लेखी निवेदन प्राप्त झाले. उर्वरित दोनपैकी एका कर्मचाऱ्याचे निवेदन प्राप्त झाले नाही व एका कर्मचाऱ्याचे निधन झाले. यास्तव, महानगरपालिका आयुक्त यांनी १३ कर्मचाऱ्यांपैकी निधन झालेल्या एका कर्मचाऱ्याचे दोषारोपपत्र वगळण्याचे आदेश पारित केले. उर्वरित १२ कर्मचाऱ्यांपैकी निवेदन सादर न केलेल्या एका कर्मचाऱ्याचे व निवेदन सादर केलेल्या ११ कर्मचाऱ्यांपैकी ७ कर्मचाऱ्यांची शिक्षा कायम केली आणि उर्वरित ४ कर्मचाऱ्यांच्या शिक्षेत बदल केला. सदर १२ कर्मचाऱ्यांपैकी ७ कर्मचारी सहाय्यक अभियंता व दुय्यम अभियंता पदाचे असल्याने त्यांचे शिक्षादेश पारित करण्यात आले आहे. ५ कर्मचारी कार्यकारी अभियंता या पदाचे असल्याने त्यांच्यावर शिक्षादेश बजाविण्यापूर्वी मसुदा पत्रास स्थायी समितीची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर शिक्षादेशाचा मसुदा स्थायी समितीकडे सादर करण्यात आला. स्थायी समितीने पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील बहुतांश धर्मादाय रुग्णालये रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार घेण्याचा आग्रह करित असल्याबाबत

**(६३) * १०६१६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील बहुतांश धर्मादाय रुग्णालये जनआरोग्य योजनेतून केलेल्या उपचाराचा खर्च शासनाकडून वैद्यकिय प्रतिपूर्ती देयकाच्या रुपात परत मिळत असल्याने निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार घेण्याचा आग्रह करित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना निर्धन रुग्ण निधीतून (आयपीएफ) मोफत उपचार देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णांचा "आयपीएफ" निधी संपेपर्यंत निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देऊ नये किंवा अशा रुग्णांचे अर्ज मुख्यमंत्री सहायता निधीकडे पाठवू नयेत असे स्पष्ट निर्देश धर्मादाय आयुक्तांनी दिलेले असतानाही बहुतांशी रुग्णालये त्याकडे दुर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१ कक अंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेशित केलेल्या योजनेनुसार व्याखित धर्मादाय वैद्‌यकीय केंद्रात निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना अनुक्रमे मोफत व सवलतीच्या दराने वैद्‌यकीय उपचार देणे बंधनकारक आहे.
(३) हे खरे नाही.

तथापि, धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ५७५ दिनांक ०३/०१/२०२० अन्वये तत्कालीन धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी ज्या रुग्णालयांकडे आयपीएफ फंड शिल्लक आहे, अशा रुग्णालयांनी मुख्यमंत्री वैद्‌यकीय सहाय्यता निधीमधून अर्थसहाय्य प्राप्त करण्याकरीता रुग्णांचे अर्ज पाठवू नये, असे धर्मादाय रुग्णालयांना निर्देशीत केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कौसा, मुंब्रा (जि.ठाणे) येथील प्राईम क्रिटिकेअर या खाजगी रुग्णालयाला लागलेल्या आगीबाबत

**(६४) * १०८१४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौसा, मुंब्रा (जि.ठाणे) येथील प्राईम क्रिटिकेअर या खाजगी रुग्णालयाला लागलेल्या आगीत ४ रुग्णांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयास आग लागण्याची कारणे काय आहेत, तसेच रुग्णालयात आग नियंत्रण व सुरक्षेसंदर्भात तपासणी करण्यात आली होती काय व केव्हा,

(३) असल्यास, सदर दुर्घटनेप्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व मृतांच्या कुटुंबियांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले, व त्यानुषंगाने मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासह दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा येथील प्राईम क्रिटिकेअर रुग्णालयात दिनांक २८/०४/२०२१ रोजी आगीची दुर्घटना घडली होती.

सदर दुर्घटनाग्रस्त रुग्णालयाच्या अतिदक्षता व जनरल वॉर्डात उपचार घेत असलेल्या रुग्णांना इतर रुग्णालयात स्थलांतरित करण्यात आले असता स्थलांतरानंतर रुग्णालयात उपचारादरम्यान ४ रुग्णांचा मृत्यू झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) व (३) सदर रुग्णालयाची तपासणी अग्निशमन विभागामार्फत माहे जानेवारी, २०२१ मध्ये करण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

उपरोक्त दुर्घटनेच्या अनुषंगाने चौकशीकरीता महानगरपालिका स्तरावर गठीत सात सदस्यीय समितीने अहवाल सादर केला असून त्यामध्ये खालील कारणे नमूद करण्यात आली आहेत :-

- दुर्घटनाग्रस्त रुग्णालयातील विद्युत वितरण व्यवस्थेत विद्युतभार ओवरलोड झाल्याने शॉर्टसर्किट होऊन वायरींगमध्ये आग लागली.
- संबंधित रुग्णालयाने वीज वितरण कंपनीकडून मंजूर केलेल्या क्षमतेपेक्षा जास्त विद्युतभार वापरात आणला होता.

(४) व (५) सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विविध रुग्णालयाच्या अग्निसुरक्षेच्या उपाययोजना व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षमीकरण करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

- महानगरपालिका हद्दीतील सर्व खाजगी रुग्णालयांना आग प्रतिबंधक उपाययोजना, विद्युत सुरक्षेबाबत तांत्रिक ज्ञान इत्यादी बाबतचे प्रशिक्षण देणे या संदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
- त्याकरीता दिनांक ०९/०६/२०२१ रोजी आदेश निर्गमित करुन सर्व खाजगी रुग्णालयांना तात्काळ अमंलबजावणी करण्यास कळविण्यात आले आहे.

सदर दुर्दैवी मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांच्या कुटुंबीयांना रुपये ५ लक्ष प्रत्येकी नुकसान भरपाई प्रदान करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोहाडी व भंडारा (जि.भंडारा) तालुक्यांतर्गत असलेल्या खडकी ते भिलेवाडी मार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(६५) * ११६१३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी व भंडारा (जि.भंडारा) तालुक्यांतर्गत असलेल्या खडकी ते भिलेवाडी मार्गाची खड्ड्यांमुळे दुरवस्था होऊन जिवितहानी व वित्तहानी झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देवून रस्त्याची सार्वजनिक बांधकाम विभागाने दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, खडकी येथील संचालक, बजरंग राइस मिल व परिसरातील वाहतूकदारांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार सदर रस्त्यांची दुरुस्ती/ नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही. अशी कोणतीही हानी झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्ते संबंधीच्या विविध योजनांतर्गत मंजूर कामे सद्य:स्थितीत प्रगतीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा-म्हसवड (जि. सातारा) रस्ता रुंदीकरणाचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(६६) * ११३७० श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील सातारा-म्हसवड रस्ता रुंदीकरणाचे काम सन २०१७ मध्ये सुरु होऊन माहे ऑक्टोबर, २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून अद्यापपर्यंत ५० टक्के इतकेही काम झाले नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम कंत्राटदाराने आयआरसी मानकाप्रमाणे केलेले नसून रस्त्याचे काम करतांना डायव्हरजन केलेला रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक असताना डांबरीकरण न करणे, मातीचे भराव करुन रस्ता करण्यात येणे तसेच वाहनधारकांच्या सुरक्षेसाठी सेप्टी बॅरीकेट्स लावणे आवश्यक असताना तशा कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या नसल्यामुळे वाहनधारकांना नाहक त्रास होत असल्याने त्यांचेकडून वारंवार तक्रारी करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीनूसार कंत्राटदाराने विहीत कालावधीत काम पूर्ण न करता अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असल्याने संबंधित कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याचे काम कंत्राटदाराने आयआरसी मानकांप्रमाणे केलेले आहे. तसेच रस्त्याचे काम करतांना तात्पुरते डायव्हरजन केलेला रस्ता मुरूमी रस्ता केलेला आहे. तात्पुरते डायव्हरजन साठी डांबरीकरण करतांना संबंधित शेतकरी यांनी विरोध केल्यामुळे डांबरीकरण करता आले नसले तरी सदर तात्पुरते डायव्हरजन वाहतूक योग्य राहण्यासाठी कंत्राटदाराकडून वेळोवेळी दुरुस्त करून सुस्थितीत ठेवले आहे. तसेच वाहनधारकांच्या सुरक्षेसाठी सेफ्टी बॅरीकेट्स, माहितीफलक लावणेत आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेगाव-पंढरपूर पालखी मार्गाचे काम मागील दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(६७) * १०४१० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव पंढरपूर पालखी मार्गाचे काम मागील दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पालखी मार्गाचे काम संबंधित कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे प्रलंबित असून यामुळे सदर मार्गावरील गावांमधील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार शेगाव पंढरपूर पालखी मार्गाचे मागील दोन वर्षांपासून प्रलंबित असलेले काम तात्काळ पूर्ण करणेबाबत व सदर कामात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित कंत्राटदार कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

म.रा.र.वि.महामंडळ (मर्या) अंतर्गत विषयांकित रस्त्यापैकी मंठा सरहद्द ते कुसळंब नविन राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी या रस्त्याचे व मजबुतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. मंठा सरहद्द ते कुसळंब या महामार्गाचे बांधकाम करीत असताना तेथील नागरीकांनी बऱ्याच वेळेस काम बंद केले होते. त्यामुळे काही महीने कामावर पोलीस बंदोबस्त घेवून काम चालू करण्यात आले. तसेच कोवीड-१९ मुळे कामास विलंब झाला. सदर महामार्गाचे बांधकाम शिघ्र गतीने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर महामार्गाचे बांधकाम प्रगतीपथावर असून सरासरी ९४.१५ टक्के काम पूर्ण झाले आहे. तसेच भुसंपादन धोरणात विलंब झाल्यामुळे व कोवीड-१९ मुळे कंत्राटदारास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे कामास विलंब झालेला आहे. त्यामुळे कंत्राटदारावर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) १. स्थानिक नागरिक, विविध संघटना, इत्यादींचा तीव्र विरोध

२. रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे तोडण्याची परवानगी

३. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या विदयुत वाहिन्या, पाणीपुरवठा वाहिन्या इ. चे स्थलांतर.

४. सदरील काही लांबीतील काम पोलीस संरक्षणात करावे लागले.

५. सदर महामार्गाचे बांधकामासाठी उदा. वळण सुधारणा, पथकर नाका, नवीन आखणी इ. साठी लागणारे जमीनीचे भुसंपादन धोरणात विलंब झाल्यामुळे.

६. कोवीड-१९ मुळे मुदतवाढ.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.